**या पुस्तकाचा मजकूर फोटोझिंको मुद्रणालय, पुणे येथे मागणी अधिकाऱ्यांच्या सुधारित बदलांसह नव्याने डी.टी.पी. करण्यात आलेला आहे, त्याची प्रथम मुद्रिते मागणी अधिकाऱ्यांस वाचनासाठी दिलेली असून त्यांच्या दुरुस्त्या होणे बाकी आहे, ही अंतिम सॉफ्टकॉपी नाही. याची कृपया नोंद घ्यावी. १९/११/२०१५**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

(सन १९६२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

# महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

**(१४ सप्टेंबर २०१५ पर्यंत सुधारित)**

MAHARASHTRA ACT No. III OF 1962

# Maharashtra Industrial Development Act, 1961

*(As modified upto 14 Sept. 2015)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

**२०१५**

**[ किंमत रु.  ]**

# महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

२. व्याख्या

प्रकरण दोन

**महामंडळाची स्थापना आणि रचना**

३. महामंडळाची स्थापना करणे आणि त्यांचे कायद्याने संस्थापन करणे

४. रचना

५. सदस्य होण्यासाठी अनर्हता

६. पदावधी व सदस्यांच्या सेवेच्या शर्ती

७. महामंडळाच्या सभा

८. सदस्य म्हणून राहण्याचे बंद होणे

९. रिकाम्या जागा कशा भराव्यात

१०. सदस्यांची तात्पुरती अनुपस्थिती

११. कामकाज निर्दोष व विधिग्राह्य म्हणून गृहीत धरणे

१२. महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी

१३. महामंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग समावून घेणे व हा अधिनियम लागू असलेल्या बाबींच्या संबंधातील राज्य शासनाची आबंधने स्वत:कडे घेणे.

## **अनुक्रमणिका**--चालू

**कलमे**

प्रकरण तीन

**महामंडळाची कामे आणि अधिकार**

१४. कामे

१५. महामंडळाचे सर्वसाधारण अधिकार

१६. महामंडळाच्या आदेशाचे आणि दस्तऐवजांचे अधिप्रमाणन

१७. सेवा आकार बसविण्याचा अधिकार

१८. राज्य शासनाने निदेश देणे

प्रकरण चार

**वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा**

१९. महामंडळाच्या मत्तेचे उपायोजन

२०. महामंडळाचा निधी

२१. महामंडळाला अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे व आगाऊ रकमा देणे

२२. महामंडळाचा कर्ज काढण्याचा अधिकार

२३. अनामत रकमा

२४. राखीव व इतर निधी

२५. निधीतून रकमा खर्च करणे

२६. अर्थसंकल्प आणि कामाचे कार्यक्रम पत्रक

२७. लेखे व लेखापरीक्षा

२८. समवर्ती व विशेष लेखापरीक्षा

प्रकरण पाच

**सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम हा महामंडळाच्या जागांना लागू करणे व भाडे नियंत्रण अधिनियम त्यांस लागू न होणे**

२९. महामंडळाच्या जागांना, मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकणे) अधिनियम, १९५५ लागू असणे.

३०. भाडे नियंत्रण अधिनियम हा महामंडळाच्या जागांना लागू नसणे.

## **अनुक्रमणिका**--चालू

**कलमे**


प्रकरण सहा

**जमीन संपादन करणे व तिचा विनियोग करणे**

३१. या प्रकरणाच्या तरतुदी लागू असणे.

३२. सक्तीचे संपादन

३३. नुकसानभरपाई देणे

३४. न्यायालयाकडे अपील करणे

३५. वाटणीसंबंधातील वाद

३६. नुकसानभरभाई देणे

३७. न्यायालयात अनामत ठेवलेली रक्कम गुंतवणे

३८. व्याज देणे

३९. महामंडळाने जमिनीचा विनियोग करणे

४०. (वगळण्यात आले)

४१. (वगळण्यात आले)

४२. राज्य शासनाच्या अधिकारांचे प्रत्यायोजन

प्रकरण सहा-क

**औद्योगिक क्षेत्रातील वापरात नसलेल्या अतिरिक्त जमिनी**

४२-अ. औद्योगिक क्षेत्रातील वापरात नसलेल्या अतिरिक्त जमिनीचे संपादन आणि इतर उद्योगांना त्यांचे नियत वाटप.

प्रकरण सात

**अनुपूरक आणि किरकोळ तरतुदी**

४३-१अ सरकारी जमिनी

४३. औद्योगिक क्षेत्रातील जमिनीच्या मालकाने विवक्षित कसूर केल्याच्या बाबतीत महामंडळाचे अधिकार

४४. इमारत पाडून टाकण्याबाबतचा आदेश

४५. इमारतीचे बांधकाम थांबविण्याचा अधिकार

४६. जमीन धारण करण्याच्या शर्तींचे उल्लंघन करून बांधकाम केल्यास किंवा जमिनीचा उपयोग केल्यास शास्ती.

## **अनुक्रमणिका**--चालू

**कलमे**

प्रकरण सात--चालू

४७. नळमार्ग टाकणे, इत्यादीबाबत अधिकार

४८. प्रवेश करण्याचे अधिकार

४९. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे इतर अधिकार निहित असणे

५०. स्थानिक प्राधिकरणांना निदेश देण्याचे शासनाचे अधिभावी अधिकार

५०-अ. विवक्षित प्रकरणांत लगतच्या क्षेत्रातील जमिनीचा वापर, औद्योगिक प्रयोजनाकरिता रूपांतरित करून घेण्यासाठी करण्यात आलेले अर्ज नाकरण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

५१. महामंडळाला येणे असलेल्या रकमा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणे

५२. नोटिशी बजावणे, इत्यादी

५३. जाहीर नोटिशा कशा प्रसिद्ध कराव्यात.

५४. नोटिशा, इत्यादीद्वारे वाजवी मुदत ठरविणे

५५. विवरणपत्रे सादर करणे, इत्यादी

५६. क्षेत्र किंवा वसाहत किंवा तिचा भाग काढून टाकणे

५७. कर्तव्य पार पाडण्यात कसूर

५८. महामंडळाचे विसर्जन

५९. खटला भरण्याचा अधिकार

६०. महामंडळाचे अपराध आपसात मिटवणे

६१. कंपन्यांनी केलेले अपराध

६२. अटकाव केल्याबद्दल शास्ती

६३. नियम करण्याचा अधिकार

६४. विनियम करण्याचा अधिकार

६५. सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण

६६. महामंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारीवर्ग हे लोकसेवक असणे

६७. इतर कायद्यांशी विसंगत असलेल्या तरतुदींची परिणामकता

६८. शंका व अडचणी दूर करण्याचा अधिकार

६९. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३[१]

## [महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१]

**[ या अधिनियमास २८ फेब्रुवारी, १९६२ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली; ही अनुमती महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार, दिनांक १ मार्च, १९६२ मध्ये प्रथम प्रकाशित झाली. ]**

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

**सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**

**सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.**

**सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५.**

**सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१५-९-१९७६) †**

**सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.**

**सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ *(२९-७-१९८१) †**

**सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७.**

**सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ (२९-१२-१९९७) †**

**महाराष्ट्र राज्यातील, औद्योगिक क्षेत्रांत व औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्याची पध्दतशीर स्थापना करण्यासाठी विशेष तरतूद करणे, आणि सामान्यत:, त्यांची घडण करण्यास सहाय्य देणे व त्या प्रयोजनांसाठी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करणे, आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे यांबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक क्षेत्रात व औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्याची पध्दतशीर स्थापना करणे शक्य व्हावे म्हणून विशेष तरतूद करणे, आणि सामान्यत: त्यांची घडण करण्यास सहाय्य देणे व त्या प्रयोजनांसाठी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करणे आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९६१, भाग पाच, पृष्ठे ४३५-४३६ पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

* सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ६ द्वारे सन १९८१ चा महाराष्ट्र अध्या. क्रमांक १० निरसित करण्यात आला.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१" असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) हा अधिनियम, त्याचे प्रकरण ६ खेरीज करून, ताबडतोब अंमलात येईल; प्रकरण ६ हे राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत वेळोवेळी नेमून देईल त्या क्षेत्रात व त्या दिनांकापासून अंमलात येईल :

[१] [ परंतु, जर राज्य शासनाच्या मते जेथे प्रकरण सहा अंमलात आणले आहे अशा कोणत्याही क्षेत्राची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यकता नसेल किंवा आवश्यकता पडण्याचा संभव नसेल तर, राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास, अशा दिनांकाच्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टीबाबत असेल त्याव्यतिरिक्त, त्या क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रकरण सहा अंमलात असण्याचे बंद होईल, असा निदेश देता येईल :

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

परंतु आणखी असे की, प्रकरण सहा अंमलात आणल्याच्या दिनांकापासून विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या समाप्तीनंतर राज्य शासनाकडून पहिल्या परंतुकाखाली कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभापूर्वी ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले असेल अशी क्षेत्रे आणि अशा प्रारंभानंतर ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले जाईल अशी क्षेत्रे यांसाठी वेगवेगळे कालावधी विहित करता येतील ].

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,--

(अ) "सुखसोय" यात रस्ता, पाण्याचा किंवा विजेचा पुरवठा, सडकांवर दिवाबत्ती करणे, जलनि:सारण, मलनिर्यासाची कामे, साफसफाईची कामे यांचा आणि राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी सुखसोय म्हणून जी कोणतीही इतर उपयुक्त गोष्ट विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही गोष्टीचा समावेश होतो;

(ब) "इमारत" याचा अर्थ, राहण्यासाठी किंवा औद्योगिक, व्यापारविषयक किंवा इतर प्रयोजनांसाठी ज्याचा उपयोग करण्याचा इरादा असेल, असे कोणतेही बांधकाम, उभारणी किंवा अशा बांधकामाचा अथवा उभारणीचा भाग असा आहे--मग त्याचा प्रत्यक्षपणे उपयोग करण्यात येत असो वा नसो;

(क) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, एखाद्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे आणि त्यात या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्याकरिता राज्य शासनाने विशेषकरून नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(ड) "महामंडळ" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, असा आहे;

---

[१] ही परंतुके १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या, कलम २ अन्वये जादा दाखल करण्यात आली.

(इ) व्याकरणविषयक होणाऱ्या फेरफारासह "विकास" याचा अर्थ, जमिनीत, जमिनींवर किंवा जमिनीच्याखाली इमारत बांधकाम, अभियांत्रिकी कामे, दगडाचे खाणकाम किंवा इतर कामे करणे, किंवा कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत कोणताही महत्त्वाचा बदल करणे, असा आहे; आणि त्यात पुनर्विकासाचा समावेश होतो, परंतु त्यात खाणीविषयक कामांचा समावेश होत नाही; आणि "विकास करणे" या संज्ञेचा त्याप्रमाणे अर्थ लावण्यात येईल;

(फ) "अभियांत्रिकी कामे" यात, एखाद्या रस्त्यावर जाण्यायेण्याच्या मार्गाची योजना करणे किंवा असे मार्ग टाकणे किंवा पाणी पुरवठ्याच्या साधनांची व्यवस्था करणे, यांचा समावेश होतो;

(ग) "औद्योगिक क्षेत्र" याचा अर्थ, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेल्या ज्या कोणत्याही क्षेत्राचा विकास करावयाचा असेल आणि ज्यात उद्योगधंद्यांना जागा द्यावयाची असेल असे कोणतेही क्षेत्र, असा आहे;

(ह) "औद्योगिक वसाहत" याचा अर्थ, राज्य शासनाने निवड केलेल्या ज्या कोणत्याही जागेत महामंडळ कारखाने आणि इतर इमारती बांधील आणि ते कोणत्याही उद्योगधंद्यांसाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या उद्योगधंद्यासाठी जी जागा उपलब्ध करून देईल ती कोणतीही जागा, असा आहे;

(आय) "जाण्यायेण्याची साधने" यात, वाहनांसाठी किंवा पादचाऱ्यांसाठी असलेल्या रस्त्याचा किंवा कोणत्याही जाण्यायेण्याच्या साधनांचा समावेश होतो—मग असा मार्ग किंवा अशी साधने खाजगी असोत वा सार्वजनिक असोत;

(ज) "जागा" याचा अर्थ, कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भाग, असा आहे आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :--

(१) अशा इमारतीस किंवा इमारतीच्या भागाशी संबंध असलेला बगीचा, पटांगण आणि उपगृह असल्यास ते उपगृह, आणि

(२) इमारतीचा अधिक फायदेशीर उपयोग व्हावा म्हणून अशा इमारतीस किंवा इमारतीच्या भागास जोडलेली कोणतीही जोडकामे;

(ट) "विहित केलेले" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

१८९४ चा एक. (ठ) "जमीन" आणि "हितसंबंध असलेली व्यक्ती" या शब्दप्रयोगांचा अर्थ, त्यांना अनुक्रमे भूमि संपादन अधिनियम, १८९४, याच्या कलम ३ मध्ये जो अर्थ नेमून दिला आहे तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

## महामंडळाची स्थापना व रचना

३. (१) महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक क्षेत्रात व औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्याची त्वरित व पद्धतशीर स्थापना आणि त्यांची घडण करण्याच्या आणि त्यासाठी मदत देण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" या नावाचे एक महामंडळ स्थापन करील. महामंडळाची स्थापना करणे आणि त्याचे कायद्याने संस्थापन करणे.

(२) उक्त महामंडळ, हा एक निगम-निकाय असेल आणि त्याची परंपरा अखंड असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल, आणि त्याला त्या नावाने दावा लावता येईल, तसेच त्या नावाने त्याच्यावर दावा लावता येईल तसेच महामंडळास जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा, तसेच या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल.

रचना [1] [ ४. महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, १९८१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून विद्यमान सदस्यांच्याऐवजी महामंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल :-- १९८१ चा महा. ४४.

(अ) जो महामंडळाचा सभापती असेल असा पदसिद्ध उद्योग मंत्री;

(ब) जो महामंडळाचा उपसभापती असेल असा पदसिद्ध उद्योग राज्यमंत्री;

(क) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेले दोन शासकीय सदस्य, ज्यांपैकी एक सदस्य महामंडळाचा वित्तीय सल्लागार असेल;

(ड) वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८ अन्वये रचना करण्यात आलेल्या राज्य वीज मंडळाचा अध्यक्ष; १९४८ चा महा. ५४.

(इ) व्यवस्थापन संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ मर्यादित;

(फ) व्यवस्थापन संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ;

(ग) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य; १९७७ चा महा. २८.

(ह) ज्या कोणत्याही व्यक्ती, त्यांना उद्योगधंद्याचा, व्यापाराचा किंवा वित्तव्यवस्थेचा अनुभव असल्यामुळे आणि त्याबाबतीत त्यांनी क्षमता दर्शविली असल्यामुळे अर्ह आहेत असे राज्य शासनास वाटत असेल किंवा राज्य शासनाच्या मते ज्या, उक्त व्यवसाय करणाऱ्या किंवा त्यात काम करणाऱ्या व्यक्तींच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करण्यास समर्थ आहेत, अशा व्यक्तींमधून राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेले सहा सदस्य;

(आय) जो महामंडळाचा सचिवही असेल असा महामंडळाचा पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी ].

सदस्य होण्यासाठी अनर्हता. ५. एखादी व्यक्ती, --

(अ) महामंडळाची मुख्य कार्यकारी अधिकारी नसून जी महामंडळाचा कर्मचारी असेल, किंवा

(ब) जी विकल मनाची असेल आणि जिला सक्षम न्यायालयाकडून विकल मनाची म्हणून ठरविण्यात आले असेल, किंवा

(क) अमुक्त नादार असेल,

तर, अशी व्यक्ती महामंडळाचा सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट केली जाण्यास अपात्र असेल.

पदावधी व सदस्यांच्या सेवेच्या शर्ती. [2] [६. (१) (क) कलम ४, खंड (ङ) किंवा (ज) अन्वये नामनिर्दिष्ट केलेला महामंडळाचा प्रत्येक सदस्य, त्याचा पदावधी राज्य शासनाने आधीच समाप्त केला नसेल तर त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(ख) कोणत्याही अशा सदस्याचा पदावधी पूर्ण झाल्यामुळे किंवा पदावधी आधीच समाप्त करण्यात आल्यामुळे त्याचे पद रिकामे झाल्यास, कलम ९ च्या तरतुदींनुसार उक्त रिकामे पद भरण्यात येईल].

(२) [3] [कलम ४ चे खंड (ग) किंवा (झ)] अन्वये नामनिर्दिष्ट केलेल्या, महामंडळाच्या सदस्यांना विहित करण्यात येईल ते वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क असेल. अशा सदस्यांपैकी कोणत्याही एक किंवा अनेक सदस्यांस, त्याने किंवा त्यांनी करणे आवश्यक असलेल्या अतिरिक्त किंवा खास सेवेबद्दल, राज्य शासन ठरवून देईल असे वाजवी जादा पारिश्रमिक देता येईल.

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४ च्या कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४ दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

(३) [१] [कलम ४ च्या [२] [ खंड (घ), (ङ), (च), (छ) किंवा (ज) ] अन्वये पद धारण करणाऱ्या ] महामंडळाचे सदस्य महामंडळाच्या किंवा त्याच्याखालील कोणत्याही समितीच्या किंवा महामंडळाने अथवा महामंडळासाठी हाती घेतलेल्या कामाच्या संबंधात नेमलेल्या समितीच्या सभांना उपस्थित राहण्यास लागलेला वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी, विहित करण्यात येईल असे मानधन किंवा पूरक भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

(४) ज्या कोणत्याही व्यक्तीस एका किंवा अधिक प्रसंगी सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या व्यक्तीस अपात्र ठरविण्यात आले नसेल तर तो पुन्हा नामनिर्दिष्ट केला जाण्यास पात्र असेल.

[३][(५) एखादी व्यक्ती कोणतेही पद धारण करीत असल्यामुळे महामंडळाची सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आली असेल किंवा सदस्य झाली असेल त्या बाबतीत, ती, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, तिने ते पद धारण करण्याचे बंद होताच महामंडळाची सदस्य असण्याचे बंद होईल.]

७. (१) या अधिनियमान्वये केलेल्या विनिमयाद्वारे तरतूद करण्यात येईल त्यावेळी आणि त्या ठिकाणी महामंडळाच्या सभा भरविण्यात येतील आणि पोट-कलम (२) च्या तरतुदीस अधीन राहून, महामंडळाचे कामकाज चालविण्याच्या संबंधात अशा विनियमांद्वारे कार्यपद्धतीविषयक जे नियम ठरवून देण्यात आले असतील त्या नियमांचे अशा सभांत पालन करण्यात येईल. महामंडळाच्या सभा.

(२) महामंडळाने किंवा त्याच्यावतीने केलेल्या किंवा करावयाचे योजलेल्या संविदेत, कर्जात, व्यवस्थेत किंवा प्रस्तावात ज्या कोणत्याही सदस्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असेल किंवा हितसंबंध असेल त्या सदस्याने, शक्य तितक्या लवकर, आपल्या हितसंबंधाच्या स्वरूपाबाबत महामंडळाला माहिती दिली पाहिजे आणि इतर सदस्यांनी माहिती मिळविण्याच्या प्रयोजनाकरिता त्यास उपस्थित राहण्याविषयी फर्माविले नसेल तर, त्या सदस्यांस महामंडळाच्या कोणत्याही सभेत, ज्यावेळी अशा कोणत्याही संविदेच्या, कर्जाच्या, व्यवस्थेच्या किंवा प्रस्तावाच्या संबंधात चर्चा चालू असेल त्यावेळी तेथे हजर राहता येणार नाही; परंतु अशारीतीने उपस्थित राहण्यास फर्माविण्यात आलेल्या कोणत्याही सदस्यास अशा कोणत्याही संविदेच्या, कर्जाच्या, व्यवस्थेच्या किंवा प्रस्तावाच्या संबंधात मतदान करता येणार नाही ;

परंतु, एखाद्या सदस्यास अशा कोणत्याही संविदेशी, कर्जाशी, व्यवस्थेशी किंवा प्रस्तावाशी संबंधित असलेल्या कंपनीचा शेअर धारण केला आहे केवळ याच कारणावरून त्या सदस्याचा त्यात उपरोक्त प्रमाणे संबंध किंवा हितसंबंध आहे असे समजण्यात येणार नाही.

८. (१) जर एखादा सदस्य,--

(अ) कलम ५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेच्या कक्षेत येईल, किंवा सदस्य म्हणून राहण्याचे बंद होणे.

(ब) राज्य शासनाकडे आपला लेखी राजीनामा पाठवील आणि अशा राजीनाम्याचा राज्य शासनाने स्वीकार केला असेल. किंवा

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ४(क) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ३(क) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ४(ड) अन्वये हे पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

(क) महामंडळाच्या परवानगीवाचून, महामंडळाच्या लागोपाठ तीन सभांत, किंवा लागोपाठ तीन महिने महामंडळाच्या सर्व सभांत गैरहजर राहील, किंवा

(ड) त्यास, नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होणाऱ्या अपराधांबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल, तर त्याचे महामंडळाचा सदस्य म्हणून राहण्याचे बंद होईल.

(२) राज्य शासनाच्या मते,--

(अ) महामंडळाच्या कोणत्याही सदस्याने काम करण्यास नकार दिला असेल, किंवा

(ब) तो काम करण्यास असमर्थ झाला असेल, किंवा

(क) सदस्य म्हणून त्याने आपल्या पदाचा दुरुपयोग केल्यामुळे त्याचे महामंडळावर राहणे महामंडळाच्या किंवा सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक असेल, किंवा

(ड) अन्यथा तो सदस्य म्हणून राहण्यास अयोग्य झाला असेल,

तर, त्याबाबतीत, राज्य शासनास, आदेशाद्वारे, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी महामंडळाच्या अशा कोणत्याही सदस्यास त्याच्या पदावरून तात्पुरते काढून टाकता येईल किंवा त्यास पदावरून दूर करता येईल;

परंतु अशा कोणत्याही सदस्यास अशा आदेशाविरुद्ध कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्यावाचून त्यास पदावरून तात्पुरते काढून टाकता येणार नाही किंवा त्यास पदावरून दूर करता येणार नाही.

रिकाम्या जागा कशा भराव्यात.

९. महामंडळाच्या सदस्यांची कोणतीही रिकामी जागा, शक्य तितक्या लवकर, भरण्यात येईल आणि जणू त्या जागी करावयाची नेमणूक ही प्रथमत:च करण्यात येत आहे असे समजून ज्या रीतीने नेमणूक करण्यात येते त्या रीतीने ती जागा भरण्यात येईल;

परंतु, ज्या मुदतीपर्यंत अशी जागा रिकामी राहील त्या मुदतीत, चालू राहिलेल्या सदस्यास जणू अशी कोणतीही जागा रिकामी झाली नव्हती असे समजून काम करता येईल.

सदस्यांची तात्पुरती अनुपस्थिती.

[१][१० (१) सभापती अनुपस्थितीत, उपसभापती ही कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असेल.

(२) जर उपसभापती किंवा महामंडळाचा कोणताही अन्य सदस्य, आजारीपणामुळे किंवा अन्य कारणामुळे आपली कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ झाला असेल किंवा त्यास राज्य शासनाने अनुपस्थित राहण्यास परवानगी दिलेली असेल किंवा ज्यामुळे त्याचे सदस्यत्व समाप्त होणार नाही अशा परिस्थितीत अन्यथा तो आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला असेल तर, राज्य शासनास त्याच्या जागी यथास्थिति, उपसभापती म्हणून किंवा अन्य सदस्य म्हणून काम करण्यासाठी आणि या अधिनियमाद्वारे व तद्न्वये त्याची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणूक करता येईल. यथास्थिति, उपसभापती किंवा अन्य सदस्य आपल्या कामावर रुजू होईल त्या दिनांकास अशी व्यक्ती पद रिकामे करील.]

कामकाज निर्दोष व विधिग्राह्य म्हणून गृहीत धरणे.

११. महामंडळाच्या सभापती किंवा उपसभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही अनर्हतेमुळे किंवा तिच्या नेमणुकीत कोणताही दोष असल्यामुळे महामंडळाची कोणतीही कृती किंवा कामकाज, जर ते इतर बाबतीत या अधिनियमाच्या तरतुदीनुसार असेल तर, सदोष होते असे समजता येणार नाही.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १० दाखल करण्यात आले.

१२. (१) राज्य शासन महामंडळासाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी, १[ एक किंवा अधिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी ] आणि मुख्य लेखा अधिकाऱ्याची नेमणूक करील. महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

(२) महामंडळाला आपली कर्तव्ये आणि कामे सक्षमतेने पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली असणारे, इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील.

(३) अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेमणुकीच्या आणि सेवेच्या शर्ती आणि त्यांचे वेतनमान ही

(अ) मुख्य कार्यकारी अधिकारी [2][एक किंवा अधिक उप मुख्य कार्यकारी अधिकारी] आणि मुख्य लेखा अधिकारी यांच्या बाबतीत विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील, आणि

(ब) इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत या अधिनियमान्वये केलेल्या विनियमाद्वारे ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

१३. (१) शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग क्रमांक आयडीएल-२३६०/१४०७५५-आयएन.डी.आय, दिनांक १ ऑक्टोबर १९६० अन्वये स्थापन केलेल्या औद्योगिक विकास मंडळाच्या विद्यमान कर्मचारीवर्गातील व्यक्तीपैकी राज्य शासन निदेशित करील अशा व्यक्तींना महामंडळ आपल्याकडे घेईल व कामावर लावील; आणि अशा रीतीने घेतलेली व कामावर लावलेली प्रत्येक व्यक्ती ही, प्रस्तुत अधिनियम आणि तद्न्वये केलेले नियम व विनियम यांच्या तरतुदीस अधीन असेल ; महामंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असलेल्या बाबींच्या संबंधातील राज्य शासनाची आबंधने स्वत:कडे घेणे.

परंतु, --

(अ) अशा नोकरीच्या मुदतीत उक्त कर्मचारीवर्गातील व्यक्ती वेतन, रजा, निवृत्ति, भत्ते निवृत्तीवेतने, भविष्यनिर्वाह निधी यासंबंधीच्या सर्व गोष्टी व त्याच्या सेवेच्या इतर शर्ती यांचे नियमन. मुंबई नागरी सेवा नियम किंवा राज्य शासन वेळोवेळी करील असे इतर नियम या अन्वये करण्यात येतील;

(ब) कोणत्याही अशा व्यक्तीस पदावतन करणे, बडतर्फ करणे किंवा सेवेतून काढून टाकणे, दंड करणे किंवा इतर कोणतीही शिक्षा करणे याविषयीच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करण्याचा हक्क असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये महामंडळाने आपल्याकडे घेतलेल्या व कामावर लावलेल्या उक्त कर्मचारीवर्गापैकी सर्व स्थायी कर्मचाऱ्यांचा राज्य शासनाच्या सेवेतील त्यांच्या जागावर धारणाधिकार कायम राहील, आणि राज्य शासनाच्या सेवेत ते पुन्हा परत गेले असता महामंडळांखालील त्यांच्या सेवेची मुदत ही, त्यांची वेतनवाढ. निवृत्तीवेतन व त्यांच्या सेवेसंबंधीच्या इतर गोष्टींसाठी हिशेबात धरली जाईल.

(३) महामंडळाची प्रथमतः स्थापना होण्यापूर्वी, महामंडळाकडे सोपविण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीच्या किंवा औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या कोणत्याही योजनांच्या संबंधात या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता राज्य शासनाने किंवा उपरोक्त औद्योगिक विकास महामंडळाने पत्करलेली सर्व आबंधने व राज्य शासनाने किंवा उपरोक्त औद्योगिक विकास मंडळाने किंवा त्यांच्याशी किंवा त्यांच्यावतीने केलेल्या सर्व संविदा तसेच राज्य शासनाने किंवा उपरोक्त औद्योगिक विकास मंडळाने किंवा त्यांच्याबरोबर किंवा त्यांच्यावतीने ठरविलेल्या सर्व बाबी आणि गोष्टी या महामंडळाने, महामंडळाबरोबर किंवा महामंडळाच्यावतीने पत्करण्यात, करण्यात किंवा ठरविण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल आणि तद्नुसार राज्य शासनाकडून

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ५ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

किंवा यथास्थिति औद्योगिक विकास मंडळाकडून किंवा त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात येतील असे सर्व दावे व इतर कायदेविषयक कार्यवाही या, महामंडळाकडून किंवा महामंडळाच्या विरुद्ध चालू ठेवण्यात किंवा दाखल करण्यात येतील.

(४) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांकरिता औद्योगिक विकास मंडळाने जो खर्च केला असेल तो सर्व खर्च त्या दिनांकास, कलम, २१ अन्वये महामंडळाला दिलेले कर्ज आहे असे समजले जाईल; आणि असा खर्च करून संपादन केलेली सर्व मालमत्ता महामंडळाकडे निहित होईल :

[१] [ परंतु, अशा मत्तेसंबंधातील आपल्या व्यवहारात मंडळाने कोणतीही भांडवली जमा वसूल केली असेल त्याबाबतीत, अशा जमा रकमा या पोट-कलमान्वये मंडळाला दिलेले कर्ज म्हणून समजण्यात येणाऱ्या रकमेतून वगळण्यात येतील ].

## प्रकरण तीन

## **महामंडळाची कामे आणि अधिकार**

कामे. १४. महामंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील :--

(एक) सामान्यत: महाराष्ट्र राज्यात उद्योगधंद्यांची त्वरित व पद्धतशीर स्थापना करण्यात व त्यांची वाढ करण्यास तसेच, त्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन देणे व त्या संबंधात मदत करणे, आणि

(दोन) विशेषत:, आणि खंड (एक) च्या सर्वसाधारणतेस बाध न आणता,--

(अ) राज्य शासनाने निवडलेल्या ठिकाणी औद्योगिक वसाहतीची स्थापना करणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे;

(ब) राज्य शासनाने या प्रयोजनासाठी निवडलेल्या औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे आणि उपक्रमांची स्थापना होण्यासाठी अशी क्षेत्रे त्यांना उपलब्ध करून देणे;

[२] [ * * * * * * ]

(क) ज्या प्रयोजनांसाठी महामंडळाची स्थापना करण्यात आली असेल ती प्रयोजने आणि तत्संबंधित बाबी पार पाडण्यासाठी इतर निगम-निकाय किंवा परिसंस्था किंवा शासन, किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्याशी संयुक्तपणे किंवा अभिकरणाच्या तत्त्वावर योजना किंवा कामे हाती घेणे.

महामंडळाचे सर्वसाधारण अधिकार. १५. या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून महामंडळास खालील अधिकार असतील :--

(अ) आपल्या कामकाजापैकी कोणतेही कामकाज पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर या दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करणे व ती धारण करणे आणि महामंडळाला योग्य वाटतील अशा शर्तीवर त्याने धारण केलेली कोणतीही मालमत्ता पट्ट्याने देणे, तिची विक्री करणे, अदलाबदल करणे किंवा इतर प्रकारे तिचे हस्तांतरण करणे;

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये खंड (ग) वगळण्यात आला.

(ब) आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा इमारती बांधण्यास किंवा अशा कामांची अंमलबजावणी करण्यास कोणतीही जमीन करार करून विकत घेणे किंवा ती पट्ट्याने किंवा कुळवहिवाटीच्या कोणत्याही स्वरूपात घेणे;

(क) औद्योगिक वसाहतीत आणि औद्योगिक क्षेत्रात सुखसोयी आणि सर्वसामान्य सोयी पुरविणे किंवा पुरविण्याची व्यवस्था करणे आणि त्यासाठी बांधकामे व इमारती बांधणे आणि त्या सुस्थितीत ठेवणे किंवा सुस्थितीत ठेवण्याची व्यवस्था करणे;

(ड) उद्योगपती किंवा औद्योगिक उपक्रम सुरू करण्याचा ज्यांचा इरादा आहे अशा व्यक्तींना इमारती भाड्याने किंवा विक्रीद्वारे उपलब्ध करून देणे;

(इ) अशा उद्योगधंद्यातील कामगारास राहण्यासाठी इमारती बांधणे;

(फ) (एक) महामंडळाने स्थापन केलेल्या व विकसित केलेल्या औद्योगिक वसाहतीतील योग्य व्यक्तींना कारखान्यासाठी छपऱ्या किंवा राहण्याचे गाळे आणि अशा इमारती किंवा त्यांचे भाग (राहण्यासाठी) वाटून देणे;

(दोन) अशा दिलेल्या जागांच्या वाटणीत फेरबदल करणे किंवा ती रद्द करणे. (यात ज्या अटींवर व शर्तींवर जागा देण्यात आल्या असतील त्या अटी व शर्ती यांचे उल्लंघन केल्यास अशा संबंधित व्यक्तींना काढून टाकण्याबाबतचा हक्क आणि अधिकार समाविष्ट असेल);

(ग) महामंडळाला सल्ला देण्यासाठी सल्लागार समित्यांची स्थापना करणे;

(ह) महामंडळाला आपली कामे पार पाडता यावीत म्हणून त्यास सहाय्य देण्यासाठी योग्य सल्लागार व्यक्ती किंवा विशेष ज्ञान किंवा कौशल्य असलेल्या व्यक्तींची नेमणूक करणे;

(आय) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीस अधीन राहून, आपल्या समित्या किंवा अधिकारी यांपैकी कोणत्याही समितीकडे किंवा अधिकाऱ्याकडे सर्वसामान्यत: किंवा विशेषकरून आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार प्रत्यायोजित करणे आणि त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांकडे विशिष्ट अधिकार पुन्हा प्रत्यायोजित करण्यास त्यांना परवानगी देणे; delegation

(ज) आपली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यास त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व संविदा करणे व त्या पार पाडणे; आणि

(के) आपले कामकाज योग्यरीतीने पार पाडण्यास आणि या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यास त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर गोष्टी व कामे करणे.

महामंडळाच्या आदेशांचे आणि दस्तऐवजांचे अधिप्रमाणन.

१६. महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा महामंडळाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या सहीने महामंडळाचे सर्व परवाने, आदेश, निर्णय, नोटीसा आणि इतर दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यात येतील.

सेवा आकार बसविण्याचा अधिकार. [1][ १७. कोणत्याही संविदेत किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, महामंडळाने रस्ते, जलनिस्सारण, पाणीपुरवठा व त्याच्याकडून तरतूद करण्यात येतील अशा रस्त्यावरील दिवाबत्तीच्या तरतुदींसह इतर सेवा व सुखसोयी यांच्या परिरक्षणावर महामंडळाला करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा दरांनी फी किंवा सेवा आकार बसवणे कायदेशीर असेल. अशी फी किंवा आकार भूखंडधारकांवर किंवा सेवा अथवा सुखसोयी याचा लाभ घेणाऱ्या इतर व्यक्तींवर बसवता येईल.]

राज्य शासनाने निदेश देणे. १८. राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी धोरणासंबंधी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटातील असे धोरणविषयक सर्वसाधारण किंवा विशेष निदेश महामंडळास देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करणे आणि त्याप्रमाणे कार्य करणे ही गोष्ट महामंडळावर बंधनकारक असेल.

## प्रकरण चार

## वित्तव्यवस्था, लेखा आणि लेखापरीक्षा

महामंडळाच्या मत्तेचे उपयोजन. १९. महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता ही, या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, महामंडळ धारण करील व तिचे उपयोजन करील.

महामंडळाचा निधी. २०. (१) महामंडळाचा स्वत:चा एक निधी असेल व त्यास तो राखून ठेवील व त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :--

(अ) अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे, अगाऊ देण्यात आलेल्या रकमा किंवा इतर स्वरूपात राज्य शासनाकडून महामंडळाला मिळालेला सर्व पैसा;

(ब) या अधिनियमान्वये महामंडळाला मिळालेली फी, खर्च व आकार;

(क) जमिनी, इमारती व इतर स्थावर किंवा जंगम मालमत्ता यांचा विनियोग करून आणि इतर व्यवहार करून महामंडळाला मिळालेला सर्व पैसा.

(ड) भाडे व नफा या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही साधनांपासून महामंडळाला मिळालेला सर्व पैसा.

(२) महामंडळाला भारताच्या स्टेट बँकेमधील किंवा राज्य शासन या बाबतीत मान्यता देईल अशा इतर बँकेमधील चालू खात्यात किंवा ठेव खात्यात, विहित करण्यात येईल असा, महामंडळाच्या निधीतील पैसा ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेला पैसा, राज्य शासनाकडून मान्य करण्यात येईल अशा रीतीने गुंतविण्यात येईल.

(३) अशा खात्यांतील पैशाचा व्यवहार, याबाबतीत केलेल्या विनियमांद्वारे महामंडळाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा महामंडळाच्या अधिकाऱ्यांद्वारे करण्यात येईल.

[2] [ (४) पोट-कलमे (२) व (३) यात काहीही अंतर्भूत असले तरी, महामंडळास, त्याच्या दैनंदिन व्यवहारांसाठी विहित करण्यात येतील अशा मर्यादांस व शर्तींस अधीन राहून, त्याला योग्य वाटेल अशी रक्कम हाती ठेवता येईल. ]

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ८ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आला.

२१. राज्य शासनास, याबाबतीत केलेल्या कायद्याद्वारे राज्य विधान मंडळाकडून योग्य रितीने विनियोजन करण्यात आल्यानंतर. या अधिनियमान्वयेची महामंडळाची कामे पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशी अनुदाने, अर्थसहाय्ये, कर्जे आणि आगाऊ रकमा महामंडळाला देता येतील, महामंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर राज्य शासन निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर सर्व अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे व आगाऊ रकमा देण्यात येतील. महामंडळाला अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे व आगाऊ रकमा देणे.

[1][२२. [2][(१) विहीत करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने महामंडळास स्वत:साठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करून घेण्यासाठी हमीसहित किंवा हमीविना असलेली बंधपत्रे, ऋणपत्रे, रोखे काढून किंवा अन्यथा, खुल्या बाजारातून, कर्ज घेता येईल, किंवा कोणत्याही अनुसुचित बँकांकडून किंवा त्याबाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी मान्यता देईल अशा इतर बँकांकडून किंवा वित्तीय परिसंस्थांकडून कर्ज घेता येईल. ] महामंडळाचा कर्ज काढण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये महामंडळास कोणत्याही वेळी कर्जाऊ घेता येईल अशी कमाल रक्कम पंचाहत्तर कोटी रुपये असेल. मात्र राज्य शासनास, राज्य विधानसभेची मान्यता घेऊन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या प्रयोजनासाठी यापेक्षा जास्त कमाल रक्कम निश्चित करता येईल. ]

२३. महामंडळाला, त्यास योग्य वाटतील अशा शर्तींवर, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी ज्यांना जमीन, इमारती किंवा पडव्या वाटून किंवा विक्री करून देण्यात येतील, किंवा देणे संभवनीय असेल अशा व्यक्तींकडून, प्राधिकाऱ्यांकडून किंवा संस्थांकडून अनामत रकमा घेता येतील. अनामत रकमा.

२४. (१) राज्य शासन, वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे महामंडळ राखीव निधीची किंवा विशिष्ट नावाने ओळखण्यात येईल अशा निधीची तरतूद करील. राखीव व इतर निधी.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था, त्या निधीत वेळोवेळी जमा करण्यासाठी म्हणून हस्तांतरित करावयाच्या रकमा आणि त्यांत असलेल्या पैशाचे उपयोजन करणे या बाबी महामंडळाकडून ठरविण्यात येतील.

(३) राज्य शासनाच्या आगाऊ संमतीशिवाय, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या निधीपैकी कोणत्याही निधीचा उपयोग, उक्त निधीची ज्या प्रयोजनासाठी स्थापना करण्यात आली असेल या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही.

२५. (१) महामंडळाला, यथास्थिति, कलम २० मध्ये उल्लेखिलेल्या महामंडळाच्या सामान्य निधीतून किंवा कलम २४ मध्ये उल्लेखिलेल्या राखीव किंवा इतर निधीतून या अधिनियमान्वये अधिकृत करण्यात आलेल्या प्रयोजनासाठी त्यास योग्य वाटतील अशा रकमा खर्च करण्याचा अधिकार असेल. निधीतून रकमा खर्च करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, महामंडळाला, कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याने किंवा सांविधिक सार्वजनिक उपक्रमाने, महामंडळाच्या औद्योगिक वसाहती किंवा औद्योगिक क्षेत्रे यांपैकी कोणत्याही औद्योगिक वसाहतीच्या किंवा औद्योगिक क्षेत्राच्या संबंधात, जमीन संपादन करण्यात आलेला खर्च धरून, अशा प्राधिकाऱ्याच्या किंवा उपक्रमाच्या सांविधिक कामांपैकी कोणतेही काम करण्यासाठी केलेल्या किंवा असे काम करण्यासाठी करावयाच्या खर्चादाखल, त्यास योग्य वाटतील अशा रकमा, अंशदान म्हणून देता येतील.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ च्या कलम २ अन्वये १ एप्रिल १९७६ पासून पूर्वलक्षी प्रभावासह दाखल करण्यात आले.

अर्थसंकल्प आणि कामाचे कार्यक्रमविषयक पत्रक.

२६. (१) महामंडळ, प्रत्येक वर्षातील विहित करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत, एक वार्षिक वित्तीय विवरणपत्र आणि लगतनंतरच्या वित्तीय वर्षासाठीच्या कामाच्या कार्यक्रमाबद्दलचे विवरणपत्र तयार करील व ते मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करील.

(२) वार्षिक वित्तीय विवरणपत्रात, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा तपशीलासहित, लगतनंतरच्या वित्तीय वर्षामध्ये मिळणाऱ्या अंदाजित रकमा व होणारा अंदाजित खर्च दर्शविण्यात येईल.

(३) महामंडळ, वर्षातील कामाच्या कार्यक्रमविषयक पत्रकात फेरफार करण्यास सक्षम असेल; परंतु, असे फेरफार करणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातून पुनर्विनियोजन करणे हे पूरक वित्तीय विवरणपत्राद्वारे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात येईल.

(४) वार्षिक वित्तीय विवरणपत्र आणि कामाचे कार्यक्रमविषयक पत्रक आणि पूरक वित्तीय विवरणपत्र यांची प्रत्येकी एक प्रत ही, राज्य शासनाला मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

लेखे व लेखापरीक्षा.

२७. (१) महामंडळ, त्यांचे कामकाज व व्यवहार या संबंधात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, लेखा पुस्तके व इतर पुस्तके ठेवील.

[१] [ (२) महामंडळाच्या लेख्याची नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम १९, पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार नेमलेल्या लेखापरीक्षकाकडून किंवा राज्य शासनाने नेमलेल्या इतर कोणत्याही लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षा करण्यात येईल.] १९७१ चा ५६.

(३) महामंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा झाल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, महामंडळ त्याची एक प्रत, लेखापरीक्षकाच्या त्यावरील अहवालाच्या प्रतीसह राज्य शासनाकडे पाठवील.

(४) राज्य शासनाने, पोट-कलम (३) अन्वये त्याच्याकडे पाठविण्यात आलेले महामंडळाचे लेखे व त्यावरील लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे दरवर्षी ठेवण्याची व्यवस्था करील.

समवर्ती व विशेष लेखा परीक्षा.

२८. (१) निकटपूर्वीच्या कलमांत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महामंडळाच्या हिशेबांची समवर्ती तपासणी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून करण्यात यावी असा आदेश देता येईल. तसेच, राज्य शासनास, कोणताही विशिष्ट व्यवहार, किंवा विशिष्ट वर्गातील किंवा मालिकेतील व्यवहार किंवा विशिष्ट मुदत यासंबंधी महामंडळाच्या लेख्यांची विशेष तपासणी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून करण्यात यावी असाही निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यात येईल तेव्हा, महामंडळ, पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेल्या व्यक्तीस, लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक असतील असे लेखे सादर करील आणि त्यास आवश्यक वाटेल अशी माहिती पुरवील किंवा पुरविण्याची व्यवस्था करील.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ च्या कलम ३ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

## प्रकरण पाच

## सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम हा महामंडळाच्या जागांना लागू करणे व भाडे नियंत्रण अधिनियम त्यास लागू न होणे

१९५६ चा मुंबई २. २९. (१) राज्य शासनास, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, तीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून [१] मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९५५, हा सरकारी जागांच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होत असेल त्याचप्रमाणे तो महामंडळाच्या स्वाधीन असलेल्या, त्याच्याकडे निहित असलेल्या किंवा त्याने पट्ट्याने दिलेल्या जागांस पोट-कलम (२) च्या तरतुदीस अधीन राहून, लागू होईल अशी तरतूद करता येईल. महामंडळाच्या जागांना मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९५५, लागू असणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यावर, उपरिनिर्दिष्ट अधिनियम आणि त्याअन्वये केलेले नियम हे पुढील फेरफारांसह महामंडळाच्या जागांना लागू असतील :--

(अ) राज्य शासनाच्या मते जे पद उप-जिल्हाधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्या दर्जापेक्षा कमी नसेल असे पद-- मग ते शासनाच्या किंवा महामंडळाच्या अधीन असो-- जो धारण करीत असेल किंवा ज्याने धारण केले असेल अशा व्यक्तीची राज्य शासन, उपरिनिर्दिष्ट प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करील. [२] [ आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी किंवा त्याच क्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून एक किंवा अधिक अधिकाऱ्यांची नेमणूक करता येईल. ]

(ब) उक्त अधिनियम व त्या नियमातील "सरकारी जागा" या संबंधातील उल्लेख हे "महामंडळाच्या जागे" संबंधातील उल्लेख आहेत आणि कलमे ४, ५, ६ व ९ मधील "राज्य शासन" या संबंधातील उल्लेख हे महामंडळाच्या संबंधातील उल्लेख आहेत, असे समजले जाईल.

१९४७ चा मुंबई ५७. ३०. * मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवास-गृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७, किंवा राज्याच्या कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेला तत्सम इतर कोणताही कायदा हा,-- भाडे नियंत्रण अधिनियम हा, महामंडळाच्या जागांना लागू नसणे.

(अ) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी महामंडळाच्या स्वाधीन असलेल्या किंवा त्यांच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही जागांस लागू असणार नाही;

(ब) अशा कोणत्याही जागांच्या संबंधात महामंडळाने निर्माण केलेल्या कोणत्याही वहिवाटीच्या हक्कास किंवा तत्सम संबंधास महामंडळाविरुद्ध लागू असणार नाही;

(क) परंतु, महामंडळास भाड्याने दिलेल्या कोणत्याही जागांस तो लागू असेल.

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, नोंद क्रमांक ५९ द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र सरकारी जागा" (काढून टाकण्याबाबत) अधिनियम अशी सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून करण्यात आली असल्याचे मानण्यात यावे.

[२] सन १९७५ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* आता, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९, पहा.

प्रकरण सहा [३,४]

## जमीन संपादन करणे व तिचा विनियोग करणे

या प्रकरणाच्या तरतुदी लागू असणे.

३१. या प्रकरणाच्या तरतुदी या राज्य शासनाकडून कलम १, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचित करण्यात येईल अशा क्षेत्रास व त्या दिनांकापासून लागू होतील.

---

[३] सन १९६७ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ चे कलम ७ खालीलप्रमाणे आहे :--

भरपाईमधील फरकाची मागणी करण्याचा अधिकार व विवक्षित संपादनांची विधिग्राह्यता.

"७. (१) मुख्य अधिनियमाच्या प्रकरण ६ अन्वये, कोणतीही जमीन संपादन केल्याबद्दल द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम, दिनांक ८ जून १९६७ पूर्वी जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केली असेल अशा कोणत्याही बाबतीत, जिल्हाधिकाऱ्यांच्या अशा निर्णयाविरुद्ध त्या अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये कोणतेही अपील करण्यात आलेले नसेल किंवा असे अपील करण्यात येऊन निकालात काढण्यात आले असले तरी, जिल्हाधिकाऱ्याच्या अशा निर्णयामुळे, किंवा अपील केल्यावर न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, उक्त दिनांकापासून एक वर्षाच्या आत, त्याच्या प्रकरणाच्या पुनर्विचारार्थ व भरपाईची रक्कम पुनः निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल व जिल्हाधिकाऱ्याने किंवा यथास्थिति न्यायालयाने पूर्वी निश्चित केलेल्या भरपाईची रक्कम आणि या अधिनियमाद्वारे सुधारल्याप्रमाणेच्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ च्या पोट-कलम (५) च्या उपबंधानुसार काढण्यात येणारी भरपाईची रक्कम यातील फरकाची (कोणताही असल्यास) मागणी करता येईल. जिल्हाधिकाऱ्याच्या अशा निर्णयाविरुद्ध केलेले कोणतेही अपील उक्त दिनांकास कोणत्याही न्यायालयात अनिर्णित असेल तर, अधिनियमाद्वारे सुधारण्यात आल्याप्रमाणेच्या उक्त कलम ३३ च्या पोट-कलम (५) च्या उपबंधानुसार त्या न्यायालयास भरपाईची रक्कम स्वतः ठरविता येईल किंवा ते प्रकरण जिल्हाधिकाऱ्याकडे त्यानुसार पुनर्विचार होऊन रक्कम पुनः ठरविली जाण्यासाठी परत पाठविता येईल. दोहोपैकी कोणत्याही याबाबतीत, उपरोक्त प्रमाणे, संबंधित पक्षकारास असा फरक (कोणताही असल्यास), मागण्याचा हक्क राहील. या कलमान्वये पुनर्विचारानंतर दिलेला जिल्हाधिकाऱ्याचा प्रत्येक निर्णय, मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ खालील अपीलास अधीन असेल.

(२) उक्त दिनांकापूर्वी प्रकरण ६ अन्वये जमिनीचे करण्यात आलेले किंवा करण्यात आल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही संपादन, आणि अशा संपादनाच्या संबंधात (काढण्यात आलेली किंवा प्रसिद्ध करण्यात आलेली कोणतीही नोटीस, करण्यात आलेला करार, काढण्यात आलेला आदेश किंवा देण्यात आलेला निर्णय धरून) करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही किंवा करण्यात आलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्याप्रमाणेच्या उक्त कलम ३३ च्या पोट-कलम (५) अन्वये भरपाईची रक्कम ठरविण्यात आली नव्हती किंवा ठरविण्याजोगी नव्हती. केवळ याच कारणावरून अवैध झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ च्या पोट-कलम (२) अन्वये करार करून भरपाई ठरविण्यात आली असेल. त्याबाबतीत, या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही."

(४) सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ चे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :--

कलम ५२ अनुसार नोटीस बजावण्यात आली असेल तर दिनांक ८ जून १९६७ पूर्वी कलम ३२(२) अन्वये काढलेली नोटीस, राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही याच केवळ कारणावरून जमीन संपादन विषयक कार्यवाही अवैध ठरते.

"३. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, मुख्य अधिनियमाच्या प्रकरण सहा अन्वये किंवा पक्षकरांच्या संमतीने किंवा त्यांच्यातील करारान्वये करण्यात आलेले किंवा करण्यात आले असल्याचे अभिप्रेत असलेले जमिनीचे कोणतेही संपादन, उक्त प्रकरणान्वये केलेली किंवा या अधिनियमाच्या प्रारंभी कोणत्याही अवस्थेत प्रलंबित असलेली कोणतीही जमीन संपादनविषयक कार्यवाही, आणि असे संपादन किंवा संपादनविषयक कार्यवाही यांच्यासंबंधी (काढलेली, बजाविण्यात आलेली किंवा प्रसिद्ध केलेली कोणतीही नोटीस, केलेला करार, अभिलिखित तडजोड, दिलेला आदेश किंवा निर्णय धरून) केलेली कोणतीही कृती किंवा गोष्ट ही, दिनांक ८ जून १९६७ पूर्वी कोणत्याही वेळी मुख्य अधिनियमाचे कलम ३२, पोट-कलम (२) अन्वये त्या प्रकरणी काढलेली नोटीस (कोणतीही असल्यास), **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेली नव्हती, परंतु त्या अधिनियमाचे कलम ५२ मध्ये घालून दिलेल्या रीतीने बजावण्यात आली होती याच केवळ कारणावरून अवैध असल्याचे किंवा ती केव्हाही अवैध झाल्याचे मानण्यात येणार नाही."

३२. (१) एखादी जमीन महामंडळाकडून विकसित केली जाण्यासाठी किंवा या अधिनियामाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असेल तर राज्य शासनाला, **राज्यपत्रात** नोटीस प्रसिद्ध करून, तीमध्ये ज्या विशिष्ट प्रयोजनांसाठी अशी जमीन आवश्यक असेल ते प्रयोजन विनिर्दिष्ट करून आणि त्यामध्ये या कलमाला अनुलक्षून, राज्य शासनाने ती जमीन संपादन करण्याचे ठरवले असल्याचे नमूद करून, ती जमीन संपादन करता येईल. सक्तीचे संपादन.

(२) पोट-कलम (१) अन्वये नोटीस प्रसिद्ध करण्यापूर्वी, राज्य शासनाने, दुसऱ्या नोटीशीद्वारे, जमिनीचा मालक आणि राज्य शासनाच्या मते उक्त जमिनीत जिचा हितसंबंध असेल, अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, नोटिशीत, निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीचे आत, जमीन का संपादन करण्यात येऊ नये, याबद्दल कारण दर्शविण्याबद्दल फर्माविल. [1] [ राज्य शासन कलम ५३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने, जाहीर नोटीस देण्याची राजपत्रात ती प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.]

[2] [ परंतु, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन, अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असल्यास, राज्य शासन असे संपादन करण्यापूर्वी,--

in Maharashtra scheduled areas:- 13 district and 59 talukas and 2872 gram panchayati and 5873 villages

(एक) ती जमीन एका पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर, संबंधित ग्रामसभेशी आणि पंचायतीशी;

(दोन) ती जमीन संबंधित गटातील एकापेक्षा अधिक पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर संबंधित ग्रामसभा व पंचायत समितीशी;

(तीन) ती जमीन संबंधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांच्या क्षेत्रामध्ये येत असेल त्या बाबतीत संबंधित ग्रामसभांशी आणि जिल्हा परिषदांशी विचारविनिमय करील; असा विचारविनिमय, राज्य शासन, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवून देईल. अशा रीतीने करण्यात येईल :

* परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामस्थांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांवर बंधनकारक राहील.

**स्पष्टीकरण**.-- या परंतुकांच्या प्रयोजनाकरिता,--

१९५९ चा मुंबई ३. (एक) "ग्रामसभा", "पंचायत" व "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना, [3] मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील;

१९६२ चा महाराष्ट्र ५. (दोन) "पंचायत समिती" व "जिल्हा परिषदा" यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.]

---

[1] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम २ (क) अन्वये हा भाग जादा दाखल करण्यात आला.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ च्या कलम ११ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[3] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या नोंद क्रमांक ७४ द्वारे, या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम अशी सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून करण्यात आली असल्याचे मानण्यात यावे."

(३) जमिनीचा मालक किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीने कोणतेही कारण दिले असल्यास त्याचा विचार केल्यानंतर आणि अशा मालकास किंवा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यावर राज्य शासनास, त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

(४) पोट-कलम (१) अन्वयेची नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्यावर, अशा प्रसिद्धीच्या दिनांकास व त्या दिनांकपासून, उक्त जमीन सर्व भारापासून मुक्त होऊन राज्य शासनाकडे संपूर्णपणे निहित होईल.

[1] [ परंतु, जर राज्य शासनाकडून किंवा त्याच्या वतीने अशा जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यापूर्वी राज्य शासनाला असे आढळून येईल की, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जमिनीची इतःपर आवश्यकता नाही, तर राज्य शासनास तत्सम नोटीशीद्वारे संपादनातून जमीन काढून घेता येईल आणि **राजपत्रात** अशी नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर पोट-कलम (१) खालील नोटीस प्रसिद्ध होण्याच्या लगतपूर्वी जमीन जिच्याकडे निहित होती त्या व्यक्तीकडे ती, त्यावेळी अस्तित्वात असतील असे भार असल्यास त्या भारांना अधीन राहून, पूर्वलक्षी प्रभावासह पुर्निहित होईल. संपादन कार्यवाहीच्या परिणामी मालकाचे आणि इतर हितसंबंधी व्यक्तींचे काही नुकसान झाले असल्यास त्याबद्दल त्यांना कलम ३३ च्या तरतुदीनुसार ठरवली असेल अशी नुकसानभरपाई मिळण्यास हक्कदार असेल.]

(५) पोट-कलम (४) अन्वये राज्य शासनाकडे कोणतीही जमीन निहित होईल, त्याबाबतीत राज्य शासनास, लेखी नोटिशीद्वारे, जमिनीचा कब्जा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, नोटीस बजाविण्यात आल्यापासून ३० दिवसांचे आत राज्य शासनाकडे किंवा या बाबतीत, त्याच्याकडून योग्य रीतीने अधिकृत करण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीकडे जमिनीचा कब्जा स्वाधीन करण्याबद्दल किंवा तिचा कब्जा देण्याबद्दल आदेश देता येईल.

(६) पोट-कलम (५) अन्वये देण्यात आलेल्या आदेशांचे पालन करण्यास जर कोणतीही व्यक्ती नकार देईल किंवा कसूर करील तर, राज्य शासनास जमिनीचा कब्जा घेता येईल व त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बळाचा उपयोग करता येईल.

[2][(७) महामंडळासाठी किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणासाठी जमीन संपादित करण्यात आली असेल त्याबाबतीत, राज्य शासनाने तिचा कब्जा घेतल्यानंतर, राज्य शासनाने **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जमीन त्या महामंडळाकडे, किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाकडे ती ज्या प्रयोजनासाठी संपादित करण्यात आली होती त्या प्रयोजनासाठी हस्तांतरित करील आणि कलम ४३-१अ च्या तरतुदी अशा रीतीने हस्तांतरित केलेल्या कोणत्याही जमिनीला लागू होतील.]

नुकसानभरपाई. **३३.** (१) या विभागान्वये राज्य शासन कोणतीही जमीन संपादन करील त्याबाबतीत, राज्य शासन अशा रीतीने जमीन संपादन केल्याबद्दल, या कलमाच्या तरतुदीनुसार ठरविण्यात येईल अशी नुकसानभरपाई देईल.

(२) राज्य शासन आणि जिला नुकसानभरपाई द्यावयाची ती व्यक्ती यांच्यात कराराअन्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यात आली तर अशी नुकसानभरपाई अशा करारानुसार देण्यात येईल.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १२(अ) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(३) असा कोणताही करार होऊ शकत नसेल, तर राज्य शासन, अशा रीतीने संपादन केलेल्या जमिनीबद्दल द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम आणि तसेच अशी रक्कम जिला किंवा ज्यांना देण्यात येईल, ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती ठरविण्यासाठी उक्त प्रकरण जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविल;

[१] [ परंतु, अशा संपादनाबद्दल द्यावयाची नुकसानभरपाई, राज्य शासन सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक असणारी, कोणतीही नुकसानभरपाई, राज्य शासनाच्या किंवा याबाबतीत राज्य शासन नेमील अशा अधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेशिवाय जिल्हाधिकाऱ्यास ठरविता येणार नाही.]

[२] [ (३क) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर त्या पोट-कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याकडे प्रकरणे विचारार्थ पाठविल्यानंतर, परंतु, नुकसानभरपाईची रक्कम त्याने अंतिमरीत्या ठरविण्यापूर्वी राज्य शासन आणि जिला नुकसानभरपाई द्यावयाची असेल ती व्यक्ती यांच्यामध्ये करार होऊन अशी रक्कम निश्चित करण्यात आली असेल तर अशा करारानुसार जिल्हाधिकाऱ्याकडून नुकसानभरपाई ठरविण्यात येईल. ]

(४) अंतिमतः नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यापूर्वी, जिल्हाधिकारी, नुकसानभरपाई देण्यात यावयाच्या प्रत्येक व्यक्तीस, नुकसानभरपाईबद्दल तिची बाजू मांडण्याची संधी देईल.

१८९४ चा १. [३] [ (५) भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम ४, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकासंबंधातील, त्या अधिनियमाची कलमे २३ व २४ यातील निर्देश हे, [४] [ या अधिनियमाच्या कलम ३२ च्या पोट-कलम (२) अन्वये जाहीर नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या दिनांकासंबंधीचे निर्देश होते] व कलम ६ खालील प्रतिज्ञापन प्रसिद्ध करावयाच्या दिनांकाच्या व वेळेच्या संबंधातील निर्देश हे, या अधिनियमाच्या कलम ३२ च्या पोट-कलम (१) खालील नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध करण्याच्या दिनांकाच्या संबंधीचे निदेश होते, या फेरफारास अधीन राहून, भूमि संपादन अधिनियम, १८९४ याची कलमे २३ व २४ यातील तरतुदी व इतर संबंधित तरतुदी नुकसानभरपाईची रक्कम ठरविताना जिल्हाधिकाऱ्यास मार्गदर्शक राहतील.]

[५] [**स्पष्टीकरण.--** या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता दिनांक ८ जून १९६७ पूर्वी या अधिनियमाचे कलम ३२ पोट-कलम (२) अन्वये नोटीस बजावयाचा दिनांक म्हणजे या अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये घालून दिलेल्या रीतीने ज्या दिनांकास नोटीस बजावण्यात आली असेल तो दिनांक असेल आणि दिनांक ८ जून १९६७ रोजी आणि त्यानंतर कलम ३२ चे उक्त पोट-कलम (२) अन्वये नोटीस प्रसिद्ध करावयाचा दिनांक म्हणजे **राजपत्रात** ज्या दिनांकास नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असेल तो दिनांक असेल.]

(६) नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याच्या प्रयोजनासाठी,--

(अ) जिल्हाधिकाऱ्यास, त्यास आवश्यक वाटतील अशी विवरणे आकारणी पत्रके त्यास देण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीस फर्मावता येईल.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २ अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १३ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ३ अन्वये पोट-कलम (५) हे नेहमीकरिताच समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[४] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ च्या कलम २ (अ) अन्वये हा मजकूर नेहमीकरिताच समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये हे स्पष्टीकरण दिनांक ८ जून १९६७ रोजी नेहमी करताच समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

(ब) तसेच, जिल्हाधिकाऱ्यांस जिचे जमिनीत हितसंबंध असल्याचे माहित असेल किंवा हितसंबंध आहेत असे वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, शक्य असेल तेथवर, सहमालक, गहाणदार कूळ म्हणून किंवा अन्यथा जमिनीत कोणताही हितसंबंध असेल अशा प्रत्येक इतर व्यक्तींचे नाव आणि अशा हितसंबंधाचे आणि विवरणपत्राच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांसाठी त्याबद्दल मिळालेले किंवा मिळणारे भाडे व नफा (कोणताही असल्यास) याचे स्वरुप असलेले विवरणपत्र त्यास देण्याबद्दल भाग पाडण्याचा अधिकार असेल.

(७) पोट-कलम (६) अन्वये विवरण, आकारणीपत्रक किंवा विवरणपत्र देणे आवश्यक असलेली प्रत्येक व्यक्ती ही भारतीय दंड संहितेच्या कलमे १७५ व १७६ च्या अर्थानुसार तसे करण्यास कायदेशीररित्या बांधील आहे असे समजण्यात येईल. १८६० चा ४५.

(८) जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही विवक्षित बाबतीत तसे करणे आवश्यक असेल तर, तज्ज्ञ साक्षीदारांचा साक्षीपुरावा ऐकून घेता येईल.

(९) जिल्हाधिकारी किंवा त्याने त्या बाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी त्याच्या पुढे ज्या जमिनीसंबंधीचे कामकाज चालू असेल अशा कोणत्याही जमिनींवर प्रवेश करण्याचा व तिची पाहणी करण्यास हक्कदार असेल.

(१०) जिल्हाधिकारी नुकसानभरपाई ठरविण्यासाठी पोट-कलम (३) अन्वये त्याच्याकडे पाठविण्यात आलेले प्रत्येक प्रकरण, शक्य तितक्या लवकर, आणि कोणत्याही बाबतीत नियमांन्वये विहित करण्यात येईल अशा मुदतीच्या आत निकालात काढील.

(११) जिल्हाधिकारी, सदरहू कलमान्वये त्याने निकालात काढलेल्या कोणत्याही प्रकरणात झालेल्या खर्चाची रक्कम आणि ती कोणी व कोणत्या प्रमाणात द्यावी हे ठरविल.

[१] [ (१२) पोट-कलम (३) अन्वये कोणतेही प्रकरण निर्णयार्थ कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले असेल त्याबाबतीत, राज्य शासनास कोणत्याही वेळी लेखी आदेशाद्वारे आणि त्यात त्यासाठीची कारणे नमूद करून, ते कोणत्याही इतर जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित करता येईल आणि असे हस्तांतरण झाल्यानंतर, आदेशात काही विशेष निदेश दिले असतील त्याखेरीज, ज्याच्याकडे ते हस्तांतरित केले असेल त्या जिल्हाधिकाऱ्यास ज्या अवस्थेत ते त्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आले त्या अवस्थेत त्याची सुनवणी करता येईल आणि ते निकालात काढता येईल किंवा त्या प्रकरणाची त्याच्याकडून नव्याने सुनावणी करण्यात येईल व ते निकालात काढता येईल.]

न्यायालयाकडे अपील करणे.

३४. [२][ (१) नुकसानभरपाईची रक्कम ठरविणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या दिनांकपासून साठ दिवसांच्या आत, जेथवर त्याचा तिच्यावर परिणाम होत असेल तेथवर, जिल्हाधिकाऱ्याकडे केलेल्या लेखी अर्जाद्वारे त्यास त्या प्रकरणाचा भूमि संपादन अधिनियम, १८९४ महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या न्यायालयाच्या निर्णयासाठी निर्देश करण्याची विनंती करता येईल आणि असा कोणताही अर्ज करण्यात येईल तेव्हा, उक्त अधिनियमाच्या भाग तीनच्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह त्या बाबतीतील पुढील कार्यवाहीस लागू होतील.] १८९४ चा १.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ च्या कलम २ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १४ (अ) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम बदली दाखल करण्यात आले.

(२) [१][ अशा निर्देशावरील ] न्यायालयाचा निर्णय आणि अशा निर्णयास अधीन राहून, नुकसानभरपाईची रक्कम ठरविणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय हा अंतिम असेल.

३५. कलम ३३ अन्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यात येईल तेव्हा, तिच्या किंवा तिच्या भागाच्या वाटपासंबंधात किंवा ती किंवा तिचा भाग ज्यांना देणे असेल त्या व्यक्तीमध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यास असा वाद न्यायालयाच्या निर्णयासाठी पाठविता येईल. वाटणी संबंधातील वाद.

३६. (१) नुकसानभरपाईची रक्कम कराराअन्वये ठरविण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासन अशा रकमेवर जिचा हक्क असेल किंवा ज्यांचे हक्क असतील अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना अशी रक्कम देईल. नुकसानभरपाई देणे.

(२) नुकासनाभरपाईची रक्कम कलम ३३ च्या तरतुदी अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासन नुसकानभरपाई मिळण्याचा ज्या हक्क असेल अशा व्यक्तींना ठरविण्यात आलेली नुकसानभारपाई देऊ करील आणि पोट-कलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही एक किंवा अनेक आकस्मिक गोष्टींमुळे प्रतिबंध होत नसेल तर, अशी नुकसानभरपाई त्यांना देईल.

(३) जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयानुसार नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती, ती घेण्यास कबूल होत नसतील तर किंवा जमीन अभिहस्तांकित करण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती नसेल किंवा नुकसानभरपाई घेण्याच्या हक्कासंबंधी कोणतेही वाद असतील तर, राज्य शासन अशा रीतीने ठरविण्यात आलेली नुकसानभरपाईची रक्कम न्यायालयात अनामत ठेवील :

परंतु, जिचे हितसंबंध असल्याचे मान्य करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाईची रक्कम पुरेशी नसल्याबद्दल विरोध नोंदवून अशी देण्यात आलेली रक्कम स्वीकारता येईल :

परंतु आणखी असे की, यात कोणत्याही मजकुरामुळे, या विभागान्वये ठरविण्यात आलेल्या नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग जी व्यक्ती घेईल अशा कोणत्याही व्यक्तीला, अशी नुकसानभरपाई किंवा तिचा भाग घेण्याचा जिला कायदेशीर हक्क असेल अशा व्यक्तीला ती देण्याची जबाबदारी टाळता येणार नाही.

३७. निकटपूर्वीच्या कलमान्वये नुकसानभरपाईची कोणतीही रक्कम न्यायालयात अनामत ठेवण्यात आली असेल त्याबाबतीत, न्यायालयास, स्वविवेकानुसार किंवा अशा रकमेत हितसंबंध असणाऱ्या किंवा हितसंबंध असल्याबद्दल हक्क सांगणाऱ्या कोणत्याही पक्षकाराने किंवा त्याच्यावतीने अर्ज करण्यात आल्यावर, त्यास योग्य वाटतील अशा शासकीय किंवा राज्य शासनाने पसंत केलेल्या रोख्यात, उक्त रकमा गुंतविण्याबद्दल आदेश देता येईल आणि ज्या जमिनीच्या संबंधात अशी रक्कम अनामत ठेवण्यात आली असेल त्या जमिनीपासून न्यायालयाच्या मते, पक्षकारांना जो फायदा मिळाला असता तोच फायदा किंवा शक्यतो तेवढाच फायदा, उक्त रकमेत हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांना मिळेल अशा रीतीने गुंतविण्यात आलेल्या कोणत्याही रकमेपासून मिळणारे व्याज किंवा इतर उत्पन्न जमा होण्याबद्दल व ते देण्याबद्दल निदेश देता येईल. न्यायालयात अनामत ठेवलेली रक्कम गुंतवणे.

३८. जमिनीचा कब्जा घेते किंवा त्यापूर्वी अशी नुकसानभरपाईची रक्कम देण्यात किंवा अनामत ठेवण्यात आली नाही तर, राज्य शासन, अशारितीने जमिनीचा कब्जा घेण्याच्या वेळेपासून अशी नुकसानभरपाईची रक्कम अशारितीने देण्यात किंवा अनामत ठेवण्यात येईतोपर्यंत, दरसाल दरशेकडा चार टक्के या दराने त्यावरील व्याजासह, ठरविण्यात आलेली नुकसानभरपाईची रक्कम देईल. व्याज देणे.

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १४ (ब) अन्वये "अशा अपीलावरील" या शब्दाऐवजी हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

महामंडळाने जमिनीचा विनियोग करणे.

३९. (१) या अधिनियमान्वये राज्य शासनाकडून देण्यात येतील अशा कोणत्याही निदेशास अधीन राहून महामंडळाला--

(अ) राज्य शासनाने संपादन केलेली आणि त्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेली कोणतीही जमीन; तीवर कोणतेही सुधारणाविषयक काम हाती न घेता किंवा पार न पाडता; किंवा

(ब) त्यास योग्य वाटतील अशी सुधारणाविषयक कामे केल्यानंतर किंवा पार पाडल्यानंतर अशी कोणतीही जमीन,

या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी त्यास इष्ट वाटेल अशा व्यक्तींना अशारितीने व अशा अटी व शर्ती यांस अधीन राहून देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जमिनीचा विनियोग करण्यासंबंधी महामंडळाचे अधिकार हे, अशारितीने अंमलात आणले जातील की, त्यामुळे व्यवहार्य असेल तेथवर,--

(अ) जर जमिनीवर कोणतीही सुधारणाविषयक कामे न करता किंवा पार न पाडता अशा कोणत्याही जमिनीची विक्री करून तिचा विनियोग करण्याचा महामंडळाचा हेतू असेल त्याबाबतीत, महामंडळ, जमिनीची सुधारणा व उपयोग या संबंधात त्यास लादणे योग्य वाटतील अशा आवश्यक गोष्टीस अधीन राहून, ज्यांच्याकडून जमीन संपादन करण्यात आली असेल अशा व्यक्तींची उक्त जमीन खरेदी करण्याची इच्छा असेल तर त्यांना ती प्रथमतः देऊ करील;

(ब) अशा कोणत्याही जमिनीवर रहात असलेल्या किंवा तीवर धंदा किंवा इतर कामे करीत असलेल्या व्यक्तींना जर त्याची महामंडळाच्या मालकीच्या असलेल्या जमिनीवर राहण्यासाठी जागा घेण्याची इच्छा असेल आणि त्या, उक्त जमिनींची सुधारणा व वापर करण्यासंबंधात महामंडळाने आवश्यक ठरविलेल्या गोष्टींचे पालन करण्यास तयार असतील तर, अशी कोणतीही जमीन त्यांच्याकडून ज्या किंमतीला संपादन करण्यात आली असेल ती किंमत विचारात घेऊन ठरविण्यात आलेल्या अटींवर, त्यांच्या वाजवी गरजानुसार अशा जमिनीवर राहण्यासाठी त्यांना जागा मिळण्याची संधी देण्यात यावी.

(३) देणगी देऊन, गहाण ठेवून किंवा भार निर्माण करून जमिनींचा विनियोग करण्याचा अधिकार महामंडळाला मिळतो असा या कलमातील कोणत्याही मजकुराचा अर्थ लावता कामा नये. परंतु वर निर्दिष्ट करण्यात आलेल्या गोष्टीस अधीन राहून, जमिनींचा विनियोग करण्यासंबंधातील या अधिनियमातील उल्लेख हे उक्त जमिनींची कोणत्याही रीतीने, विक्री करून, अदलाबदल करून किंवा पट्ट्याने देऊन किंवा कोणताही वहिवाटीचा हक्क, किंवा विशेष हक्क निर्माण करून किंवा इतर प्रकारे तिचा विनियोग करण्यासंबंधातील उल्लेख आहेत असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

४०. [सरकारी जमिनी] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ४ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

४१. [महामंडळाने आपले हितसंबंध संपादन करावेत म्हणून त्यावर सक्ती करण्याचा जमीन मालकाचा हक्क] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ४ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

राज्य शासनाच्या अधिकारांचे प्रत्यायोजन.

४२. राज्य शासनास जर त्यास योग्य वाटेल तर, याबाबतीत केलेल्या नियमान्वये या प्रकरणाखालील त्याच्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार त्याच्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

[१] [ प्रकरण सहा-क ]

## औद्योगिक क्षेत्रातील, वापरात नसलेल्या अतिरिक्त जमिनी

४२. अ (१) महामंडळाकडून विकसित करण्यात आलेल्या कोणत्याही औद्योगिक क्षेत्राचा औद्योगिक प्रयोजनासाठी पूर्णपणे वापर करण्यात आलेला आहे की नाही हे निश्चित करण्याच्या दृष्टीने, राज्य शासनास, अशा क्षेत्राबाबत पुढील माहिती समाविष्ट असणारा एक सहामाही अहवाल शासनाकडे सादर करण्याबद्दल महामंडळाला निदेश देता येईल :-- औद्योगिक क्षेत्रातील, वापरात नसलेल्या अतिरिक्त जमिनीचे संपादन आणि इतर उद्योगांना त्यांचे नियत वाटप.

(अ) औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांची एकूण संख्या व प्रत्येक भूखंडाचे क्षेत्रफळ;

(ब) भूखंडधारकांना नियत वाटप केलेल्या भूखंडांची संख्या आणि महामंडळाच्या कब्जात अजूनही असलेल्या भूखंडांची संख्या;

(क) प्रत्येक भूखंडाचा कब्जा भूखंडधारकाला सुपूर्द करण्यात आल्याचा दिनांक, ज्या कालावधीसाठी भूखंडाचे नियत वाटप केलेले असेल तो कालावधी आणि भूखंडधारकाकडून देण्यात येणारे किंवा देय अधिमूल्य किंवा भाडे;

(ड) ज्याच्या अधिकारितेत औद्योगिक क्षेत्र वसलेले असेल त्या महामंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे बांधकाम विनियम योग्यपणे विचारात घेऊन, प्रत्येक भूखंडातील न वापरलेले बांधणीयोग्य क्षेत्र;

(इ) प्रत्येक भूखंडाच्या न वापरलेल्या किती क्षेत्राची पोट-विभागणी करणे शक्य आहे आणि पोट-विभागणीनंतर न वापरलेल्या क्षेत्राचा वापर दुसऱ्या उद्योगास सामावून घेण्यासाठी करणे शक्य आहे किंवा नाही;

(फ) भूखंडधारकाला कब्जा दिल्याच्या दिनांकापासून (पूर्णतः किंवा अंशतः) कोणत्याही भूखंडाचे क्षेत्र ज्या कालावधीत वापरात नसेल तो कालावधी आणि त्यासाठी भूखंडधारकांने नमूद केलेली कारणे.

(२) असे निदेश मिळाल्यानंतर महामंडळ, औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकांना विहित नमुन्यात माहिती सादर करण्यास सांगणाऱ्या नोटिसा देईल आणि असे सांगण्यात आल्यानंतर प्रत्येक भूखंडधारक, त्याला अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, आवश्यक ती खरी व बिनचूक माहिती देण्यास कटिबद्ध असेल.

(३) औद्योगिक क्षेत्रात, कोणत्याही भूखंडाचा कोणताही वापरात नसलेला भाग आहे किंवा कसे आणि पोट-विभागणीनंतर कोणत्याही अन्य उद्योगास सामावून घेण्यासाठी अशा भागाचा उपयोग करण्याच्या दृष्टीने त्याची पोट-विभागणी करणे शक्य आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी महामंडळाला समर्थ करण्याच्या प्रयोजनाकरिता, महामंडळाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष रीतीने प्रधिकृत केलेल्या, महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आणि त्याच्या कर्मचाऱ्यांनी व कामगारांनी सर्व वाजवी वेळी, खालील गोष्टी करणे कायदेशीर असेल :--

(एक) भूखंडावर प्रवेश करून त्याचे भूमापन करणे,

(दोन) भूखंडाच्या वापरात नसलेल्या भागांच्या सीमा ठरवणे, आणि

(तीन) पूर्वोक्त प्रयोजनांसाठी आवश्यक त्या इतर सर्व कृती करणे.

(४) महामंडळाने सादर केलेल्या अहवालावरून जर राज्य शासनाची अशी खात्री झाली की, कोणत्याही भूखंडधारकाने, महामंडळाने भूखंड त्याला सुपुर्द केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या किंवा अधिक कालावधीसाठी त्याच्या भूखंडाचे कमाल बांधणीयोग्य क्षेत्र वापरलेले नाही आणि इतर कोणताही उद्योग सामावून घेण्यासाठी त्याचा उपयोग करण्याकरिता वापरात नसलेल्या भागाची पोट-विभागणी करणे शक्य आहे तर राज्य शासनास कोणत्याही संविदेत किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, भूखंडधारकाला आणि भूखंडात हितसंबंध असलेल्या इतर सर्व व्यक्तींना दुसरा उद्योग सामावून घेण्यासाठी त्याचा

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १८ च्या कलम १५ अन्वये प्रकरण सहा-क समाविष्ट करण्यात आले.

उपयोग करण्याच्या प्रयोजनाकरिता असा वापरात नसलेला भाग संपादित का करण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्यास सांगणाऱ्या नोटीसा देता येतील. राज्य शासन, कलम ५३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने, सार्वजनिक नोटीस देण्याची व्यवस्थाही करील.

(५) जेव्हा अशी कोणतीही नोटीस देण्यात येईल तेव्हा, राज्य शासन, भूखंडधारकाला आणि भूखंडात हितसंबंध असणाऱ्या इतर व्यक्तींना, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि वापरात नसलेला भाग स्वतः भूखंडधारकाला त्याच्या स्वतःच्या उद्योगाचा तत्काळ विस्तार करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे आणि अशा भागाचा वापर करण्यासाठी त्याने त्यापूर्वीच परिणामकारक उपाययोजना केलेली आहे या कारणावरून भूखंडधारकाला, किंवा भूखंडात हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला, उपस्थित होऊन अशा संपादनास आक्षेप घेण्याची मोकळीक असेल.

**स्पष्टीकरण.--** या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "परिणामकारक उपाययोजना" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पुढील उपाययोजना असा होईल :--

(एक) भूखंडधारकाने आपल्या उद्योगाच्या प्रस्तावित विस्तारांबाबत; अशा विस्तारासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी दर्शविणारा प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे; आणि

(दोन) (अ) उद्योगधंदे (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, भूखंडधारकाने, भारत सरकारकडून आवश्यक तेव्हा उद्देशपत्र किंवा औद्योगिक लायसन्स किंवा नोंदणी, मिळवली आहे; आणि १९५१ चा ६५.

(ब) भूखंडधारकाने आवश्यक तो पैसा उभारण्यासाठी, वित्तीय संस्थांबरोबर वाटाघाटी पूर्ण केलेल्या आहेत आणि लागू असेल त्याबाबतीत जिला जनतेकडून कर्ज घ्यावे लागते अशा कंपनीच्या बाबतीत, अशा विस्तारासाठी आवश्यक असलेल्या भांडवलाच्या ६० टक्के भांडवल जमा करण्यात आलेले आहे; किंवा

(क) विस्ताराच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली संयंत्रे व यंत्रसामुग्रीच्या निदान ५० टक्क्याइतक्या संयंत्राच्या व यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी भूखंडधारकाने निश्चित मागणी केलेली आहे.

(६) आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर जर राज्य शासनाची अशी खात्री होईल की, भूखंडधारकाने वापरात नसलेल्या भागाचा वापर करण्यात कसूर केली आहे किंवा तो, वापरात नसलेल्या भागाचा, औद्योगिक प्रयोजनांसाठी, वाजवी कालावधीत वापर करण्याचा संभव नाही आणि अशा वापरात नसलेल्या भागाचा, दुसरा उद्योग सामावून घेण्यासाठी उपयोग करणे शक्य आहे, तर, राज्य शासनास, कोणत्याही संविदेत किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, (अशा वापरात नसलेल्या भागावर, दुसरा उद्योग सामावून घेऊन, महामंडळाला उद्योगाची त्वरेने) वाढ करण्याची व त्यांच्या विकासाची आपली कामे नीटपणे पार पाडण्यास समर्थ करण्यासाठी, **राजपत्रात**, ज्या ज्या प्रयोजनासाठी जमीन आवश्यक आहे ते प्रयोजन विनिर्दिष्ट करणारी व तीत, या कलमाला अनुलक्षून जमिनीचे संपादन करण्याचे राज्य शासनाने ठरवले असल्याचे नमूद केलेली नोटिस प्रसिद्ध करून, अशा भागातील जमीन संपादन करता येईल. अशी नोटिस राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, जमीन, अशा प्रसिद्धीच्या दिनांकास व तेव्हापासून, सर्व भारापासून मुक्त, राज्य शासनाकडे पूर्णपणे निहित होईल.

(७) निकट पूर्ववर्ती पोट-कलमान्वये कोणतीही जमीन राज्य शासनाकडे निहित होईल त्याबाबतीत राज्य शासनास, लेखी नोटिशीद्वारे, जिच्या कब्जात जमीन असेल त्या व्यक्तीस, नोटीस बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनास किंवा याबाबतीत त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस जमिनीचा ताबा प्रत्यर्पित किंवा स्वाधीन करण्याबद्दल, आदेश देता येईल.

(८) निकट पूर्ववर्ती पोट-कलमान्वये दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यास कोणत्याही व्यक्तीने नकार दिला किंवा कसूर केली तर, राज्य शासनास जमिनीचा कब्जा घेता येईल आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

(९) या कलमान्वये राज्य शासनाने कोणतीही जमीन संपादन केली असेल त्याबाबतीत, राज्य शासन, अशा संपादनासाठी, कलम ३३ च्या तरतुदीनुसार शक्यतोवर, ठरविण्यात येईल अशी रक्कम देईल व प्रकरण ६ मधील कलम ३३ नंतरच्या कलमाच्या तरतुदी अशा रकमेच्या बाबतीतील पुढील कार्यवाही संबंधात, योग्य त्या फेरफारासह, लागू होतील :

परंतु. अशारीतीने निवाडा करण्यात व देण्यात यावयाची रक्कम ही, अधिमूल्य पट्ट्याच्या बाबतीत भूखंडधारकाने किंवा रीतीने संपादन करण्यात आलेल्या जमिनीच्या बाबतीत, महामंडळाधीन हक्क सांगणाऱ्या त्याच्या हक्क पूर्वाधिकाराने दिलेल्या अधिमूल्याची यथाप्रमाणे रक्कम व अशा अधिमूल्याच्या प्रदानाच्या दिनांकापासूनचे त्यावरील दरसाल सहा टक्के दराने व्याज, या बरोबरीच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही व पट्टा हा, भाडेपट्टा असेल त्याबाबतीत, निवाडा करण्यात यावयाची रक्कम ही अशारीतीने संपादन केलेल्या जमिनीच्या बाबतीत, महामंडळांस भूखंडधारकाकडून देय असलेल्या निव्वळ सरासरी वार्षिक प्रमाणशीर भाड्याच्या पाच पटीइतक्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.]

## प्रकरण सात

## **अनुपूरक आणि किरकोळ तरतुदी**

government lands [१] [ ४३-एक-क. (१) या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर:सरणार्थ राज्य शासनास [२] [ **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे ] ते शासन व महामंडळ सरकारी जमिनी आपसात संमत करून ठरवील अशा शर्तीवर, राज्य शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनी महामंडळाच्या स्वाधीन करता येतील.

(२) महामंडळाद्वारे किंवा त्याच्या नियंत्रणाखाली व देखरेखीखाली अशा कोणत्याही जमिनीचा विकास करण्यात आल्यावर राज्य शासनाने यासंबंधात केलेल्या विनियमांनुसार किंवा दिलेल्या निदेशानुसार महामंडळाद्वारे उक्त जमिनींच्या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये महामंडळाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीची त्यानंतर राज्य शासनास कोणत्याही वेळी आवश्यकता भासली तर, आपसात संमत करून ठरविण्यात येतील अशा अटींवर व शर्तीवर महामंडळ ती जमीन परत राज्य शासनाच्या स्वाधीन करील.]

४३. (१) स्थानिक चौकशी केल्यानंतर, किंवा महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा त्याच्याजवळ असलेल्या इतर माहितीवरून, महामंडळाच्या मते, औद्योगिक क्षेत्रातील कोणत्याही जमिनीच्या मालकाने, जमिनीच्या संबंधात जी सुखसोय करावयास पाहिजे होती किंवा अशा कोणत्याही सुखसोयीची किंवा जिच्यासाठी या अधिनियामन्वये परवानगी मिळविण्यात आली होती अशा जमिनीचा जो कोणताही विकास करावयास पाहिजे होता त्या कोणत्याही विकासाची तरतूद करण्यात कसूर केल्यास, महामंडळाला नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या मुदतीत अशी सुखसोय करून देण्यास किंवा असा विकास करायवास भाग पाडणारी नोटिस अशा मालकावर बजाविता येईल.

(२) जर नोटिशीत निर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत अशी कोणतीही सुखसोय उपलब्ध करून देण्यात आली नाही किंवा असा विकास करण्यात आला नाही तर, महामंडळाला स्वत: होऊन अशी सुखसोय उपलब्ध करून देता येईल किंवा विकास करता येईल किंवा त्यास योग्य वाटेल अशा अभिकर्त्यामार्फत अशी सुखसोय किंवा विकास करवून घेता येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, अशी कारवाई त्याच्यावर का करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची योग्य संधी महामंडळ जमीन मालकास देईल.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ५ अन्वये कलम ४३-एक-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १६ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(३) महामंडळाने किंवा त्याने नेमलेल्या अभिकरणाने सुखसोयी पुरविण्यात किंवा विकास करण्यात केलेला सर्व खर्च, राज्य शासन आदेशाद्वारे ठरवील अशा त्यावरील व्याजासह, खर्चाची मागणी करण्यात आली त्या दिनांकापासून खर्चाची रक्कम ज्या दिनांकास देण्यात आली त्या दिनांकापर्यंत महामंडळास मालकाकडून वसूल करण्यायोग्य असेल.

इमारत पाडून टाकण्या-बाबतचा आदेश.

४४. (१) औद्योगिक वसाहतीत किंवा औद्यागिक क्षेत्रात एखाद्या इमारतीचे बांधकाम अशी इमारत किंवा ज्या जमिनीवर ती इमारत उभी आहे ती जमीन, या अधिनियमान्वये ज्या अटींवर धारण करण्यात किंवा देण्यात आली आहे त्या अटींचे उल्लंघन करून सुरू करण्यात आले असेल, किंवा बांधकाम चालू असेल, किंवा पूर्ण झाले असेल किंवा विद्यमान इमारतीत बदल करण्यात आला असेल तर, महामंडळाने अधिकार दिलेल्या महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, याबाबतीत, या अधिनियमान्वये जो कोणताही खटला भरता येत असेल त्याशिवाय आणखी, आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा दोन महिन्यांहून अधिक नसेल इतक्या मुदतीत, त्या बांधकामाच्या मालकाने असे बांधकाम पाडून टाकावे असा निदेश देणारा आदेश काढता येईल आणि मालकाने अशा आदेशाचे पाल करण्यात कसूर केल्यास, त्या अधिकाऱ्यास स्वत: होऊन ते बांधकाम पाडून टाकता येईल आणि असे बांधकाम पाडण्याबद्दलचा खर्च महामंडळास मालकाकडून वसूल करण्यायोग्य असेल :

परंतु, असा आदेश का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दर्शविण्याची योग्य संधी मालकास देण्यात आल्याशिवाय असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, याबाबतीत तयार करण्यात आलेल्या विनियमाद्वारे या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या महामंडळाच्या समितीकडे, आदेशाच्या दिनांकापासून, तीस दिवसांच्या आत या आदेशाविरुद्ध अपील करता येईल. अपिलात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, अशा समितीस अपील मान्य करता येईल किंवा ते फेटाळून लावता येईल किंवा त्या आदेशाचा कोणताही भाग फिरवता येईल किंवा त्या बदल करता येईल.

(३) अपिलावरील समितीचा निर्णय, आणि केवळ अशा निर्णयास अधीन राहून, अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये काढलेला आदेश हा अंतिम असेल.

इमारतींचे बांधकाम थांबविण्याचा अधिकार.

४५. (१) एखादी इमारत किंवा ज्या जमिनीवर अशी इमारत बांधलेली आहे ती जमीन, ज्या शर्तीवर या अधिनियमान्वये धारण करण्यात किंवा मंजूर करण्यात आली असेल अशा शर्तीचे उल्लंघन करून कोणत्याही औद्योगिक वसाहतीत किंवा औद्योगिक क्षेत्रांत एखादी इमारत उभारण्यात सुरूवात केल्यास किंवा तिची उभारणी चालू ठेवल्यास किंवा ती पूर्ण करण्यात आल्यास किंवा कोणत्याही विद्यमान इमारतीत बदल करण्यात आल्यास, याबाबत अधिकार देण्यात आलेल्या महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये जो कोणताही खटला भरता येत असेल त्याशिवाय आणखी, आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकास आणि दिनांकापासून अशा उभारणीच्या संबंधीत बांधकाम बंद करण्यास फर्मावणारा आदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील आदेशानुसार जर बांधकाम बंद करण्यात आले नाही तर, महामंडळाला किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे अधिकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास ज्या व्यक्तीकडून ते बांधकाम सुरू करण्यात आले असेल त्या व्यक्तीस आणि त्याच्या सर्व मदतनिसांस आणि मजुरांस, त्या आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल त्या मुदतीच्या आत, त्या इमारतीच्या जागेतून काढून टाकण्यास, कोणत्याही पोलिस अधिकाऱ्यास फर्मावता येईल आणि असा पोलिस अधिकारी त्याप्रमाणे आदेशाचे पालन करील.

(३) पोट-कलम (२) अन्वयेच्या आदेशांचे पालन करण्यात आल्यानंतर, महामंडळाला किंवा पूर्वोक्त-प्रकारे अधिकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, इमारतीचे बांधकाम चालू ठेवण्यात आलेले नाही, याबाबत खात्री करून

घेण्यासाठी म्हणून देखरेख ठेवण्याकरिता लेखी आदेशाद्वारे एखाद्या पोलिस अधिकाऱ्यास किंवा महामंडळाच्या अधिकाऱ्यास किंवा नोकरास प्रतिनियुक्त करता येईल.

(४) कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे पालन करण्यास कसूर केल्यास, त्याचा अपराध सिद्ध झाल्यानंतर, आदेशाच्या बजावणीनंतर आदेशाचे पालन न करणे, ज्या काळापर्यंत चालू ठेवण्यात आले त्या काळातील प्रत्येक दिवसासाठी त्यास दोनशे रुपयापर्यंतच्या द्रव्य दंडाची शिक्षा करण्यात येईल.

(५) या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी, कोणत्याही व्यक्तीस झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा हानीबद्दल त्यास कोणत्याही भरपाईची मागणी करता येणार नाही.

४६. (१) जी कोणतीही व्यक्ती स्वत: होऊन किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून, ज्या शर्तीनुसार तिने ती इमारत किंवा जमीन या अधिनियमान्वये धारण केली असेल, त्या शर्तीचे उल्लंघन करून, एखाद्या औद्योगिक वसाहतीत किंवा औद्योगिक क्षेत्रांत कोणतीही इमारत बांधील किंवा बांधण्याचे चालू ठेवील किंवा इमारतीत बदल करील किंवा बदल करण्याचे चालू ठेवील तर, अपराध सिद्ध झाल्यानंतर त्या व्यक्तीला दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल आणि असे उल्लंघन करण्याचे आणखी चालू ठेवल्यास त्याबाबत, पहिल्या अपराधाबद्दल अपराध सिद्ध झाल्यानंतर तो जितके दिवस, असा अपराध करण्याचे चालू ठेवील त्या प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल. जमीन धारण करण्याच्या शर्तीचे उल्लंघन करून बांधकाम केल्यास किंवा जमिनीचा उपयोग केल्यास शास्ती.

(२) एखादी इमारत किंवा जमीन या अधिनियमान्वये ज्या शर्तीनुसार एखाद्या व्यक्तीने धारण केली असेल त्या शर्तीविरुद्ध किंवा याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन करून, त्या व्यक्तीने, औद्योगिक वसाहतीतील किंवा औद्योगिक क्षेत्रातील कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा उपयोग केल्यास, तिचा अपराध सिद्ध झाल्यानंतर पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

४७. (१) (एक) कलम १४, खंड (दोन) चा परिच्छेद (ख) अन्वये विकासासाठी घेण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रात महामंडळाला, आणि

(दोन) (क) एखाद्या पुरवठ्याच्या साधनातून गॅस, पाणी किंवा वीज वाहून नेण्याच्या प्रयोजनाकरिता किंवा (ख) कारखान्यांतील प्रक्रियेपासून तयार झालेले व निरुपयोगी द्रव्य पदार्थ कोणत्याही मधल्या क्षेत्रातून दूर वाहून नेण्यासाठी कोणतीही नाली किंवा गटार बांधण्याच्या प्रयोजनाकरिता, याबाबतीत राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्यांस अधिकार दिले आहेत अशा कोणत्याही व्यक्तींना (ज्याचा यात या कलमात "अधिकृत व्यक्ती" असा उल्लेख केला आहे). नळमार्ग टाकणे, इत्यादींबाबत अधिकार.

अशा क्षेत्रातील कोणत्याही जमिनीमध्ये, जमिनीवर किंवा जमिनीखाली, किंवा जमिनीवरून कोणतेही नळ, नळमार्ग, कोणत्याही प्रणाल, पुरवठा मार्ग किंवा सेवा मार्ग, खांब किंवा इतर साधने किंवा उकरणे टाकता येतील, ठेवता येतील, त्यांची व्यवस्था ठेवता येईल, त्यात बदल करता येईल, ती काढून टाकता येईल किंवा त्यात दुरुस्ती करता येईल.

(२) महामंडळाला किंवा याबाबतीत अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास अशा कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही जमिनीवर कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल आणि अशा प्रसंगी कलम ४८ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

(३) पोट-कलम (१) अन्वयेच्या अधिकारांचा वापर करताना महामंडळ किंवा प्राधिकृत व्यक्ती.--

१८६३ चा ५. (एक) कामी लावलेल्या जमिनीवर जर रस्ता, पूल, नाली, गटार किंवा भूयार येत असेल तर, गॅस कंपन्यांबाबत अधिनियम, १८६३ हा त्या क्षेत्रांत अंमलात नसला तरीही किंवा राज्य शासनाने अशा जमिनीस, अशा

तरतुदी लागू करण्याबाबत अधिसूचना काढलेली नसली तरीही, योग्य त्या फेरफारांसह, गॅस कंपन्यांबाबत अधिनियम, १८६३, याच्या तरतुदींचे पालन करील.

(दोन) मालमत्तेचे फारसे नुकसान होणार नाही याची काळजी घेईल.

उपरोक्त अधिकार अंमलात आणण्याच्या परिणामी सर्व हितसंबंधी व्यक्तींच्या झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल, यथास्थिति, महामंडळाकडून किंवा अधिकृत अधिकाऱ्याच्या बाबतीत राज्य शासनाकडून पूर्ण भरपाई देण्यात येईल.

(४) यांतील कोणत्याही मजकुरामुळे, सार्वजनिक उपयोगासाठी देण्यात न आलेल्या कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा इमारतीजवळून किंवा जमिनीजवळून त्यांच्या मालकांची किंवा भोगवटा करणारांची संमती न घेता, कोणताही नळ टाकण्यास, ठेवण्यास किंवा इतर कामे करण्यास महामंडळाला किंवा अधिकृत व्यक्तीस प्राधिकृत करण्यात किंवा अधिकार देण्यात येणार नाही. परंतु महामंडळाला किंवा अशा व्यक्तीस ज्या जमिनीत या अधिनियमानुसार कोणताही नळ अधीच कायदेशीररीतीने टाकण्यात आला असेल किंवा ठेवण्यात आला असेल, अशा कोणत्याही जमिनीवर कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल किंवा विद्यमान नळाच्याऐवजी कोणताही नवीन नळ टाकता येईल, आणि अशारीतीने टाकण्यात आलेल्या कोणत्याही नळाची दुरुस्ती करता येईल किंवा त्यांत बदल करता येईल:

परंतु, महमंडळाला किंवा इतर व्यक्तीला, राज्य शासनाकडून सर्वसाधारणपणे कोणत्याही वेळी उक्त जमीन संपादन करवून घेण्यास मनाई करण्यात आली आहे, असा पूर्वोक्त तरतुदींतील कोणत्याही मजकुराचा अर्थ लावण्यात येणार नाही.

प्रवेश करण्याचे अधिकार. ४८. राज्य शासनाचा कोणताही अधिकारी, महामंडळाचा कोणताही सभासद, आणि याबाबतीत महामंडळाने सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस पुढील कारणांकरिता कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीत आपले मदतनीस किंवा मजूर बरोबर घेऊन किंवा त्यांना बरोबर न घेता प्रवेश करता येईल :--

(अ) कोणतीही पाहणी, भू-मापन, मोजणी, मूल्यमापन किंवा चौकशी करणे किंवा अशी जमीन किंवा अशा इमारती यांच्या पातळ्या मोजून घेणे;

(ब) ज्यांचे बांधकाम चालू आहे अशा कामांची तपासणी करणे आणि नाली व गटार यांचा मार्ग ठरविणे;

(क) जमिनीच्या खाली खोदकाम करणे किंवा छिद्र पाडणे;

(ड) सीमा आणि जेथे काम करावयाचे त्या रेषा ठरविणे;

(इ) चिन्हे ठेवून आणि खंदक खोदून अशा पातळ्या, सीमा आणि रेषा यांच्या खुणा करणे;

(फ) या अधिनियमाची कार्यक्षमरीतीने अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक अशा इतर गोष्टी करणे :

परंतु, --

(एक) सूर्योदय आणि सूर्यास्त या दरम्यानच्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळी आणि अशा जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करणाऱ्यास किंवा जर भोगवटा करणारा कोणी नसेल तर त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकास योग्य नोटीस न देता अशा जमिनीवर किंवा इमारतीत प्रवेश दिला जाणार नाही;

(दोन) अशा जमिनीतून किंवा इमारतीतून निघून जाण्यास स्त्रियांस (स्त्रिया असल्यास) प्रत्येकवेळी योग्य संधी देण्यात येईल;

(तीन) ज्या कारणाकरिता प्रवेश करण्यात आला असेल त्या कारणाच्या प्रसंगास शक्यतोवर अनुरूप असेल तेथवर ज्या जमिनीवर किंवा इमारतीत प्रवेश करण्यात आला त्या जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करणाऱ्याचे सामाजिक किंवा धार्मिक रिवाज नेहमीच विचारात घेण्यात येईल.

४९. राज्य शासनास, महामंडळाकडे सोपविण्यात आलेल्या किंवा महामंडळाने ज्यांचा विकास केला आहे अशा औद्योगिक वसाहतीत किंवा औद्योगिक क्षेत्रात स्थापन केलेल्या किंवा स्थापन करावयाच्या औद्योगिक उपक्रमांच्या संबंधातील कोणतीही वस्तू मिळविणे व तिचे वाटप यासंबंधात त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वयेचा नियंत्रक किंवा लायसन्स देणारा अधिकारी म्हणून राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास नामनिर्दिष्ट करता येईल आणि असा अधिकारी हा राज्य शासनाचा अधिकारी नाही केवळ एवढ्याच कारणास्तव त्याच्या नामनिर्देशनास हरकत घेता येणार नाही. महामंडळाच्या अधिकाऱ्याकडे इतर अधिकार निहित असणे.

५०. इतर कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही लायसन्समध्ये किंवा परवान्यात काहीही असले तरी, औद्योगिक उपक्रम (मग तो औद्योगिक क्षेत्रातील किंवा त्याबाहेरील असो) स्थापन करण्यामध्ये, कोणत्याही सुखसोयींची मंजुरी देण्यास स्थानिक प्राधिकरणाने नकार दिल्यामुळे किंवा कोणतीही सुखसोय करण्यास ज्या शर्ती राज्य शासनास गैरवाजवी वाटतात अशा शर्ती घालण्याचा, अशा प्राधिकरणाने आग्रह धरल्यामुळे, अडथळा उपस्थित होत आहे अशी राज्य शासनाची महामंडळाने याबाबतीत केलेल्या शिफारशी धरून किंवा इतर प्रकारे खात्री होईल तर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटतील अशा शर्तीवर उक्त सुखसोय मंजूर करण्याबाबत त्या स्थानिक प्राधिकरणास निदेश देता येईल. आणि त्यानंतर अशी सुखसोय मंजूर करण्यात येईल: स्थानिक प्राधिकरणांना निदेश देण्याचे शासनाचे अधिभावी अधिकार.

परंतु, अशी सुखसोय मंजूर करण्यासाठी किंवा चालू ठेवण्यासाठी स्थानिक प्राधिकरणास द्यावयाची रक्कम, संबंधित स्थानिक प्राधिकरणास किंवा लायसन्स देणाऱ्यास, अशी सुखसोय पुरविण्यासाठी आलेल्या खर्चाच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही :

परंतु आणखी असे की, असा निदेश का देण्यात येऊ नये याबाबत कारण दर्शविण्याची स्थानिक प्राधिकरणास योग्य संधी देण्यात आल्याशिवाय राज्य शासनाकडून असा कोणताही निदेश देण्यात येणार नाही.

[1][ ५०-क शेतीच्या प्रयोजनार्थ धारण केलेल्या व औद्योगिक क्षेत्राबाहेर, परंतु त्या औद्योगिक क्षेत्राच्या बाह्य सीमेपासून सर्व बाजूंनी १० किलोमीटरच्या अंतराच्या आत असलेल्या कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, कोणतीही व्यक्ती, लघु उद्योगाव्यतिरिक्त तिच्यावर औद्योगिक उपक्रम उभारण्याच्या कृषीतर प्रयोजनासाठी तिच्या वापरात बदल करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीसाठी अर्ज करील व महामंडळ अशी परवानगी देण्यात येऊ नये म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे आपली हरकत लेखी स्वरूपात सादर करील तर जिल्हाधिकारी त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील. अशी चौकशी करण्यात आल्यानंतर त्या जमिनीवर असा औद्योगिक उपक्रम स्थापन केल्याने औद्योगिक क्षेत्राच्या सुव्यवस्थित विकासास अडथळा निर्माण होण्याचा संभव आहे याबद्दल जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल, तर उक्त अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पूर्वोक्त कृषीतर प्रयोजनासाठी जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी केलेला अर्ज जिल्हाधिकाऱ्याने नाकारणे हे कायदेशीर असेल. अस अर्ज नाकारण्यात येईल त्याबाबतीत जिल्हाधिकारी अशा नकाराची कारणे लेखी नमूद करील. विवक्षित प्रकरणात, लगतच्या क्षेत्रातील जमिनीचा वापर, औद्योगिक प्रयोजनाकरिता रूपांतरित करवून घेण्यासाठी करण्यात आलेले अर्ज नाकारण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. (१९६६ चा महा. ४१.)

**स्पष्टीकरण.** -- या कलमाच्या प्रयोजनार्थ "लघु उद्योग" म्हणजे, उद्योगातील कामावर ठेवलेल्या व्यक्तींची संख्या काहीही असली तरी, त्यातील संयंत्र व यंत्रसामग्री यामधील भांडवली गुंतवणूक दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल असा उद्योग.]

५१. कोणत्याही व्यक्तीने महामंडळाला देणे असलेल्या किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार महामंडळाने वसूल करण्यायोग्य सर्व रकमा आणि त्यासंबंधात केलेला सर्व खर्च व व्यय, वसुलीच्या कोणत्याही इतर पद्धतीस बाध न आणता, महामंडळाने अर्ज केल्यानंतर जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल. महामंडळाला येणे असलेल्या रकमा जमीन महसुलांची थकबाकी म्हणून वसूल करणे.

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १८ च्या कलम १७ अन्वये कलम ५०-क समाविष्ट करण्यात आले.

नोटिशी बजावणे इत्यादी. ५२. (१) हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेला कोणताही नियम किंवा विनियम याअन्वये कोणत्याही व्यक्तींवर बजावणे आवश्यक असलेल्या सर्व नोटिसा, आदेश आणि इतर दस्तऐवज हे, हा अधिनियम किंवा असा नियम किंवा विनियम यात अन्य प्रकारे तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त,--

(अ) जिच्यावर ते दस्तऐवज बजावयाचे ती व्यक्ती कंपनी असेल तर, कंपन्याबाबत अधिनियम, १९५६ याचे कलम ५१ च्या तरतूदीनुसार ते बजावण्यात आल्यास; १९५६ चा एक.

(ब) जिच्यावर ते दस्तऐवज बजावयाचे ती व्यक्ती भागीदारी संस्था असेल व तो दस्तऐवज ज्या नावाने किंवा ज्या पद्धतीने ती धंदा चालवीत असेल त्या नावाने ओळखून भागीदारी संस्थेच्या धंद्याच्या प्रमुख ठिकाणाच्या पत्त्यावर पाठविला असेल; आणि--

( एक) तो प्रेषण प्रमाणपत्राने किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल तर, किंवा

(दोन) धंद्याच्या उक्त ठिकाणी देण्यात आला असेल तर;

( ग) जिच्यावर तो दस्तऐवज बजावण्यात यावयाचा ती व्यक्ती सांविधिक सार्वजनिक संस्था किंवा महामंडळ किंवा संस्था किंवा इतर निकाय असेल तर, असा दस्तऐवज अशा संस्थेच्या, महामंडळाच्या किंवा निकायाच्या सचिवाच्या, कोषपालाच्या किंवा इतर मुख्य अधिकाऱ्याच्या पत्त्यावर मुख्य कार्यालयाकडे, पाठविण्यात आला असेल आणि तो,--

(एक) प्रेषण प्रमाणपत्राने किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आला असेल, किंवा

(दोन) त्या कार्यालयात देण्यात आला असेल तर;

( घ) इतर कोणत्याही बाबतीत, जर ज्या व्यक्तींवर दस्तऐवज बजवावयाचा त्या व्यक्तीचा पत्ता त्यावर लिहिण्यात आला असेल आणि--

( एक) तिला तो देण्यात किंवा देऊ करण्यात आला असेल, किंवा

(दोन) अशी व्यक्ती सापडत नसल्यास, तिच्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या शेवटच्या ठिकाणी एखाद्या ठळक भागी तो चिकटविण्यात आला असेल किंवा तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीस देण्यात किंवा देऊ करण्यात आला असेल, किंवा ज्या जमिनीशी किंवा इमारतीशी तिचा संबंध असेल त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक भागी चिकटविण्यात आला असेल किंवा,

(तीन) तो त्या व्यक्तीस प्रेषण प्रमाणपत्राने किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आला असेल तर तो दस्तऐवज रीतसर बजावण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(२) जो कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकावर बजावणे आवश्यक असेल किंवा बजावण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल असा कोणताही दस्तऐवज, आणखी कोणतेही नाव किंवा वर्णन न देता, त्या जमिनींच्या किंवा इमारतीच्या "मालकावर" किंवा यथास्थिति, "भोगवटदारावर" (त्या जमिनीचे किंवा इमारतीचे नाव लिहून) बजावण्यात यावा, आणि

(अ) जर अशा रीतीने पत्ता लिहीलेला तो दस्तऐवज पोट-कलम (१) चा खंड (ड) अनुसार पाठविण्यात किंवा देण्यात आला असेल; किंवा

(ब) जर अशा रीतीने पत्ता लिहिलेला तो दस्तऐवज किंवा त्याची एक प्रत, त्या जमिनीवरील किंवा इमारतीतील एखाद्या व्यक्तीस देण्यात किंवा देऊ करण्यात आली असेल किंवा ज्यात तो दिला पाहिजे अशी कोणतीही व्यक्ती त्या जमिनीवर किंवा इमारतीत नसल्यास, तो त्या जमिनींच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर चिकटविण्यात आला असेल;

तर तो रीतसर बजावण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(३) या कलमान्वये एखाद्या भागीदारी संस्थेवर एखादा दस्तऐवज बजावण्यात आला असेल तर तो दस्तऐवज प्रत्येक भागीदारावर बजावण्यात आल्याचे समाजण्यात येईल.

(४) एखादा दस्तऐवज एखाद्या मालमत्तेच्या मालकावर बजावणे शक्य व्हावे या प्रयोजनार्थ राज्य शासनाला किंवा यथास्थिति महामंडळाला अशा मालमत्तेच्या भोगवाटा करणारास (तसा कोणी असल्यास), लेखी नोटिशीद्वारे त्या मालमत्तेच्या मालकाचे नाव व पत्ता सांगण्यात भाग पाडता येईल.

५३. हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा विनियामान्वये देण्यात आलेली प्रत्येक जाहीर नोटीस, लेखी स्वरूपात असेल व तीवर संबंधित अधिकाऱ्याची सही असेल आणि ती नोटीस उक्त भागातील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी तिच्या प्रती चिकटून किंवा दवंडीद्वारे प्रसिद्ध करून किंवा स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन किंवा यापैकी कोणत्याही दोन किंवा त्याहून अधिक साधनाद्वारे आणि त्या अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही साधनांद्वारे, ज्या भागावर तिचा परिणाम होणार असेल अशा भागात सर्वत्र माहिती करून देण्यात येईल. जाहीर नोटीसा कशा प्रसिद्ध कराव्यात.

५४. हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियामन्वये किंवा विनियामान्वये काढण्यात आलेली कोणतीही नोटीस, कोणताही आदेश किंवा इतर दस्तऐवज याअन्वये जी गोष्ट करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही गोष्टीसाठी हा अधिनियम, किंवा नियम किंवा विनियम यात कोणतीही मुदत ठरविण्यात आली नसेल तर अशी नोटीस, असा आदेश किंवा इतर दस्तऐवज यात ती गोष्ट करण्यासाठी किंवा तिचे पाल करण्यासाठी वाजवी मुदत विनिर्दिष्ट केलेली असेल. नोटीसा इत्यादीद्वारे वाजवी मुदत ठरविणे.

५५. (१) महामंडळ, राज्य शासन वेळोवेळी त्यास फर्मावील त्याप्रमाणे, आपली विवरणे, आकडेवारी, अहवाल, लेखे व आपला कारभार चालविण्यासंबंधीची आपली मालमत्ता किंवा कार्य किंवा आपले कोणतेही नियोजित काम किंवा योजना यासंबंधीची इतर माहिती राज्य शासनाला सादर करील. विवरणे सादर करणे, इत्यादी.

(२) कलम २७ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या लेखापरीक्षेच्या अहवालाव्यतिरिक्त, महामंडळ प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी शक्य तितक्या लवकर, विहित करण्यात येईल त्या नमुन्यात व विहित करण्यात येईल असा तपशील असलेला आपल्या कामकाजाचा वार्षिक अहवाल राज्य शासनाला सादर करील, आणि त्या वार्षिक अहवालाची एक प्रत मिळाल्यानंतर राज्य शासन ती शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे सादर करील.

५६. या अधिनियमान्वये ज्या प्रयोजनाकरिता महामंडळ स्थापन करण्यात आले होते ते प्रयोजन कोणत्याही विशिष्ट औद्योगिक वसाहतीच्या किंवा औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत, किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत बऱ्याच अंशी साध्य झाले असून त्यामुळे अशी वसाहत किंवा क्षेत्र किंवा औद्योगिक क्षेत्र किंवा त्याचा भाग महामंडळाच्या अधिकाराखाली असण्याचे चालू ठेवणे अनावश्यक झाले आहे अशी राज्य शासनाची खात्री होईल तर, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशी औद्योगिक वसाहत किंवा औद्योगिक क्षेत्र किंवा त्याचा भाग महामंडळातून अधिकारितेतून काढून टाकण्यात आला आहे असे जाहीर करता येईल. तसेच राज्य शासनास अशा वसाहतीचा किंवा क्षेत्राचा किंवा त्याच्या भागाचा कारभार पाहण्यासाठी परिस्थितीनुसार आवश्यक वाटेल अशी इतर आनुषंगिक व्यवस्थासुद्धा करता येईल. क्षेत्र किंवा वसाहत किंवा तिचा भाग काढून टाकणे.

५७. (१) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार महामंडळावर लादलेल्या किंवा सोपिवलेल्या कर्तव्यापैकी किंवा आबंधनांपैकी कोणतेही कर्तव्य किंवा आबंधन पार पाडण्यात महामंडळाने कसूर केली आहे अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास राज्य शासनास, ते कर्तव्य किंवा ते आंबधन पार पाडण्यासाठी मुदत ठरविता येईल व त्याप्रमाणे महामंडळाला नोटीस देता येईल. कर्तव्य बजावण्यात कसूर.

(२) असे कर्तव्य किंवा आबंधन पार पाडण्यासाठी अशा रीतीने ठरविलेल्या मुदतीत महामंडळाने ते पार पाडण्यात कसूर किंवा हयगय केली आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनाने त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, महमंडळ निष्प्रभावित करणे व त्याची पुनर्रचना करणे हे कायेदशीर असेल.

(३) महामंडळ निष्प्रभावित करण्यात आल्यानंतर, आणि प्रकरण २ मध्ये दिलेल्या रीतीने त्याची पुनर्रचना करण्यात येईपर्यंत, या अधिनियमान्वयेचे महामंडळाचे जे अधिकार, कतव्ये व कामे असतील ती राज्य शासहनाकडून किंवा राज्य शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी नेमील अशा अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांच्या गटांकडून पार पाडण्यात येतील.

(४) महामंडळामध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता ही, निष्प्रभावित असण्याच्या मुदतीत राज्य शासनामध्ये निहित होईल.

महामंडळाचे विसर्जन. ५८. (१) या अधिनियमान्वये ज्या प्रयोजनाकरिता महामंडळ स्थापन करण्यात आले होते ती प्रयोजने बऱ्याच अंशी साध्य झाली असून त्यामुळे महामंडळ अस्तित्वात असण्याचे चालू राहणे अनावश्यक आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्या शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून महामंडळ विसर्जित होईल आणि ते त्याप्रमाणे विसर्जित झाल्याचे समजले जाईल.

(२) उक्त दिनांकापासून,--

(अ) महामंडळामध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता व निधी आणि महामंडळाने वसूल करावयाच्या सर्व येणे रकमा राज्य शासनामध्ये निहित होतील व राज्य शासनास वसूल करता येतील;

(ब) जी दायित्त्वे महामंडळाच्या बाबतीत ही अंमलात आणण्याजोगी असतील ती सर्व दायित्वे राज्य शासनाच्या बाबतीत ही अंमलात आणण्याजोगी असतील.

खटला भरण्याचा अधिकार. ५९. महामंडळाकडून किंवा महामंडळाने याबाबत सर्वसाधरण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून तक्रार करण्यात आल्यावाचून किंवा तिच्याकडून माहिती मिळाल्यावाचून, कोणतेही न्यायालयाने स्पष्टपणे अन्यथा तरतूद करण्यात आली नसल्यास, महामंडळाच्या मालकीच्या किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार महामंडळामध्ये निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधात या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

महामंडळाने अपराध आपसात मिटवणे. ६०. (१) महामंडळाला किंवा महामंडळाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार शिक्षेस पात्र ठरविण्यात आलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(२) अपराध आपसात मिटवण्यात आल्यानंतर, अपराध्यास, ती अभिरक्षेत असेल तर, सोडून देण्यात येईल आणि मिटवण्यात आलेल्या अपराधाच्या बाबतीत त्याच्याविरुद्ध पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

कंपन्यांनी केलेले अपराध. ६१. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा अशी कंपनी तसेच तो अपराध घडला त्यावेळी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती व कंपनीचे कामकाज चालविण्यास जी जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व ती कंपनी ही त्या अपराधाबद्दल दोषी आहेत असे समजले जाईल व त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असतील;

परंतु, जर कोणतीही व्यक्ती तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही शिक्षेस ती पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल व ता अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा तिच्या मुक संमतीने घडला आहे असे सिद्ध झाले तर असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजले जाईल व त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**-- या कलमाच्या प्रयोजनाकरिता,--

(अ) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे व तीत भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो; आणि

(ब) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" या संज्ञेचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

६२. जी कोणतीही व्यक्ती कलम ४८ अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस कोणत्याही जागेत किंवा इमारतीत प्रवेश करण्याचा अटकाव करील किंवा असा केल्यानंतर अशा व्यक्तीस त्रास देईल किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तिला दिलेले कोणतेही अधिकार कायदेशीररीत्या चालविण्यास अडथळा करील तर, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. अटकाव केल्याबद्दल शास्ती.

६३. (१) राज्य शासनास, महामंडळाशी संबंध असलेल्या बाबतीत महामंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील: नियम करण्याचा अधिकार.

परंतु, या कलमान्वये प्रथम नियम करताना महामंडळाशी विचारविनियम करण्याची आवश्यकता असणार नाही, परंतु असे नियम केल्यानंतर अशा नियमांत सुधारणा करण्याच्या संबंधात महामंडळ ज्या कोणत्याही सूचना करील त्या शासन विचारात घेईल.

(२) विशेषकरून व वरील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करता येईल :--

(अ) कलम ६ अन्वये महामंडळाच्या सदस्यांना द्यावयाचे वेतन, भत्ते व मानधन;

(ब) कलम १२ अन्वये महामंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी [१][ उप मुख्य कार्यकारी अधिकारी ] व मुख्य लेखा अधिकारी यांच्या नेमणुकीच्या व सेवेच्या शर्ती व वेतन श्रेणी;

(क) कलम २० अन्वये महामंडळाने चालू खाते व ठेवखाते यात ठेवावयाच्या रकमा;

(ड) कलम २२ अन्वये महामंडळाला ज्या शर्तीस अधीन राहून कर्ज काढता येईल त्या शर्ती;

(इ) कलम २६ अन्वये महामंडळाने वार्षिक वित्तीय विवरणपत्र व कामाचा कार्यक्रम राज्य शासनाला ज्या दिनांकापर्यंत सादर करण्यात येईल तो दिनांक व असे विवरणपत्र ज्या नमुन्यात तयार करण्यात येईल तो नमुना व ती रीत;

(फ) कलम २७ अन्वये लेखे ठेवण्याची रीत;

(ग) कलम ३३ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (३) अन्वये त्याच्याकडे पाठविण्यात आलेली प्रकरणे ज्या मुदतीत निकालात काढील ती मुदत;

(ह) कलम ४२ अन्वये प्रकरण ६ खालील शासनाच्या अधिकाराचे प्रत्यायोजन;

(आय) कलम ५५ अन्वये प्रकरण वार्षिक अहवालाचा नमुना व त्यात द्यावयाचा तपशील;

(ज) महामंडळाने आकारावयाची फी;

(के) नियमाद्वारे विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही गोष्ट.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात, राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारास अधीन असतील.

विनियम करण्याचा अधिकार.

६४. (१) महामंडळाला राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी व तद्न्वये केलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम करण्याचा अधिकार आहे आणि या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा विनियमात पुढील गोष्टीसाठी तरतूद करता येईल :-

(अ) कलम ७ अन्वये महामंडळाच्या सभांची वेळ व जागा आणि अशा सभांत कामकाज चालविण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ब) कलम १२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी [१] [ उप मुख्य कार्यकारी अधिकारी] व मुख्य लेखा अधिकारी यांच्या व्यतिरिक्त, इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीच्या व सेवेच्या शर्ती आणि वेतन नेमणुकीच्या व सेवेच्या शर्ती आणि वेतन श्रेणी;

(क) कलम २० अन्वये महामंडळाचे जे अधिकारी त्यांच्या खात्यातील पैशाचा व्यवहार करतील ते अधिकारी;

(ड) कलम [२][ ४३ एक-क ] अन्वये सुधारणा केल्यानंतर महामंडळाने ज्या रीतीने शासकीय जमिनींच्या बाबतीत कार्यवाही करावयाची ती रीत;

(इ) कलम ४४ अन्वये महामंडळाच्या समितीने त्या कलमान्वये अपिलांची सुनावणी करणे आणि तिने अनुसरावयाची कार्यपद्धती;

(फ) कलम ५६ अन्वये ज्या अटींस व शर्तीस अधीन राहून. औद्योगिक वसाहतीतील व औद्योगिक क्षेत्रातील जमिनी व इमारती धारण करता येतील किंवा त्यांचा उपयोग करता येईल त्या जादा अटी व शर्ती;

(ग) विनियमाद्वारे विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही गोष्ट.

(२) या कलमान्वये केलेले सर्व विनियम, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील आणि ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि, ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील, त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात, राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन असतील.

सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

६५. या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा विनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जे केल्याचे दिसून येत असेल अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

महामंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे लोक सेवक असणे.

६६. महामंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार काम करीत असतील तेव्हा किंवा तसे काम करीत असल्याचे दिसून येत असेल तेव्हा, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोक सेवक आहेत असे समजले जाईल.

१८६० चा ४५.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५७ च्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११, कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

इतर कायद्यांशी विसंगत असलेल्या तरतुदींची परिणामकता.

६७. या अधिनियमाच्या तरतुदी या इतर कोणत्याही कायद्यात त्यांच्याशी काहीही विसंगत असले तरी, परिणामक असतील.

शंका व अडचणी दूर करण्याचा अधिकार.

६८. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, जर कोणतीही शंका किंवा अडचण उपस्थित झाली तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे, अशी शंका किंवा अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या स्पष्ट तरतुदीशी विसंगत नसेल अशी तरतूद करण्याचा किंवा असा निदेश देण्याचा अधिकार आहे, आणि अशा बाबतीत राज्य शासनाचा आदेश हा अंतिम असेल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५२ याच्या अनुसूची १ ची सुधारणा.

१९५६ चा मुंबई ५२. ६९. मुंबईचा विधानमंडळ सदस्य (अपात्रता दूर करणे) अधिनियम, १९५६ अनुसूची १ मध्ये नोंद क्रमांक १० नंतर पुढील नोंद दाखल करावी :--

* "१० क. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१, याचे * [ कलम ४, पोट-कलम (१) चा खंड (ब), (क) किंवा (ड) ] अन्वये नेमलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्यांचे पद, तो असे पद धारण करतो केवळ याच कारणामुळे असे पद."

---

* सन १९८१ चा महराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे नोंद १० - क खालीलप्रमाणे आहे :

१९६२ चा महा. ३. "१०-क. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम ४ मधील खंड (ड), (ई), (फ), (ग) किंवा (ह) अन्वये नेमलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्याचे पद, तो असे पद धारण करतो केवळ याच कारणामुळे असे पद."